पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला •वर्ष १६ •अंक ९ •बुधवार, दि. १५ जुलै २०२६ •मूल्य ५ •पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

आपल्या अंगी चिकाटी आणि जिद्द असणे हेच यशाचे रहस्य आहे.

श्री बाबूजी महाराज की पावन धरा पर पहली बार श्री श्याम संकीर्तन
श्री श्याम पधारे म्हारे अंगना
भव्य भजन संध्या
भव्य दरबार
श्री श्याम बाबा स्वयंभू बोरगांव, श्री उज्जैन महाकाल, श्री सालासर बालाजी धाम
भजन प्रवाह
रामभैय्या देशपांडे
अकोला, महाराष्ट्र
16 जुलै शाम : 6.00 बजे से प्रभु इच्छा तक
स्थल : श्रीराम मंदिर विद्युत नगर, पारस
आयोजक : करने वाले श्याम करवाने वाले श्याम...!

## » थोडक्यात

### ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने भीषण अपघात; चार ठार!

**नाशिक** : नाशिक पेठ महामार्गावर असलेल्या सावळघाट येथे काल मंगळवारी रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या विचित्र अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाले आहेत. मागून येणाऱ्या ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील इको कारवर जबर धडक दिली. त्यामुळे ही कार पुढे असलेल्या ट्रॅक आणि मागून धडकलेल्या ट्रक यांच्यामध्ये दाबली गेली. यामुळे इको कारमध्ये बसलेल्या चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मारुती ओमनी इको क्र. जीजे १५ सीआर ५६५९ तर ट्रक क्र. एमएच ०४ जीएफ ८९०१असा आहे.

.............

### भीषण अपघात चौघांचा मृत्यू दोन जखमी

**मुंबई** - मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर अलीकडे अपघातांचं प्रमाण काहीसं कमी झालं असलं तरी आज बुधवारी रोजी पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. महामार्गावर उभे करण्यात येत असलेल्या मोठी मालवाहू कंटेनर यांच्यामुळेच हे भीषण अपघात घडत आहेत. या अपघातात तब्बल चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. त्या सगळ्यांना लांजा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. अपघातात दोन महिला आणि दोन पुरुषासह एकूण चार जणांचा मृत्यू झाला आहे. धडकेची तीव्रता इतकी भीषण की कारचा अक्षरशः चुराडा झाला.

...........

### टीईटी पेपरफुटी प्रकरण; मुख्य सुत्रधाराला 70 हजार रुपये!

**ठाणे** : शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीच्या प्रकरणात, फुटलेला पेपर तब्बल पाच हजार परीक्षार्थींना विकण्याचा आरोपींचा कट होता, अशी धक्कादायक माहिती तपासात पुढे आली आहे. विशेष म्हणजे, हा पेपर पुढे कितीही चढ्या किंमतीने विकला गेला, तरी प्रत्येक पेपरच्या विक्रीमागे ७० हजार रुपये या रॅकेटमधील मुख्य सूत्रधार बिजेंद्रकुमार गुप्ता; याला हवे होते, अशी माहिती ठाणे पोलिसांच्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# 20 हजार ऑटो चालकांवर बेरोजगारीचे संकट !

## अकोल्यात धावणार 'इलेक्ट्रिक सिटी बस'

प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला** : शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला आधुनिक रूप देण्यासाठी महापाकिा अकोल्यात लवकरच पर्यावरणपूरक 'इलेक्ट्रिक सिटी बस' सेवा सुरू होणार आहे. येत्या १५ ऑगस्टपासून ही सेवा प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असल्यामुळे अकोलेकरांना दिलासा मिळणार असला, तरी दुसरीकडे मात्र शहरातील जवळपास २० ते २५ हजार ऑटो चालकांसमोर उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सिटी बसच्या आगमनाने हजारो ऑटो चालक बेरोजगारीच्या उंबरठ्यावर उभे ठाकले आहेत. मोठा आर्थिक फटका ऑटो व्यावसायिकांना बसणार आहे. बदलत्या काळानुसार आणि अकोल्याच्या विकासासाठी 'इलेक्ट्रिक सिटी बस' ही शहराची अत्यंत महत्त्वाची गरज आणि सोय असली, तरी या सुविधेमुळे शहरातील २० हजार कुटुंबांचा हक्काचा रोजगार डबघाईस येणार आहे. त्यामुळे या गरीब ऑटो चालकांसाठी प्रशासन काही पर्यायी मार्ग काढणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



**१५ ऑगस्टपासून ४२ बसेस रस्त्यावर धावणार**

अकोल्यातील वाढते प्रदूषण लक्षात घेता प्रशासनाने पर्यावरणपूरक वाहतुकीवर भर दिला आहे. १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या या सेवेत एकूण ४२ इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. यामध्ये ९ मीटर लांबीच्या २८ बसेस आणि १२ मीटर लांबीच्या १४ बसेसचा समावेश आहे. या बसेसमुळे शहरातील प्रदूषण तर कमी होईलच, शिवाय प्रवाशांना सुरक्षित, स्वस्त आणि आरामदायी प्रवास करता येईल. दहा ते वीस रुपयात अकोल्यात एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी प्रवास करता येणार आहे.






### काही ऑटो चालकांची मस्ती अंगलट येणार !

शहरात सिटी बस येण्यामागे आणि प्रवाशांनी तिला पसंती देण्यामागे ऑटो चालकांची वर्तणूकही तेवढीच कारणीभूत ठरत आहे. छोट्या शहरात भर रस्त्यात कुठेही कट मारणे, प्रवासी दिसताच वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून कुठेही ऑटो अचानक थांबवणे. कर्णकर्कश 'प्रेशर हॉर्न' वाजवून अकोलेकरांना मनस्ताप देणे अकोल्याचे डोकेदूखी, मायग्रेन सारखे आजार या प्रेशर हॉर्नमुळे सुरु झाले आहेत. काही ऑटो चालकांची प्रवाशांसोबत असलेली अरेरावी आणि दादागिरी, रेल्वे स्टेशनवर महिला प्रवाशांवर शेरेबाजी या सर्व मनमानी कारभारामुळे अकोलेकर नागरिक कमालीचे वैतागले आहेत. या पार्श्वभूमीवर, सुरक्षित आणि शिस्तबद्ध प्रवासासाठी नागरिक नक्कीच सिटी बसला प्राधान्य देतील, हे उघड आहे.

### कर्ज देणाऱ्या बँकांचे काय होणार

गेल्या काही वर्षांत अकोल्यात नवीन ऑटो खरेदीचे प्रमाण लक्षणीय राहिले आहे. आरटीओच्या आकडेवारीनुसार यात मोठा बदल दिसत आहे. सन २०२३ मध्ये २३१,सन २०२४ मध्ये ७६०,सन २०२५ मध्ये ९५२ आणि चालू वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत ३०० नवीन थ्री-व्हीलर पॅसेंजर ऑटो विकत घेतले गेले आहेत. जिल्ह्यात सध्या सुमारे २६० ई-ऑटो आणि खाजगी वापराचे १,२०० ऑटो आहेत. नोंदणीकृत ७,५७३ पॅसेंजर ऑटो आणि इतर जिल्ह्यांतून येणारे ऑटो मिळून जवळपास २० ते २५ हजार ऑटो रोज शहरात धावत आहेत. यातील बहुतांश ऑटो हे बँक किंवा खाजगी फायनान्स कंपन्यांकडून कर्ज (लोन) घेऊन खरेदी करण्यात आले आहेत.

आता सिटी बस सुरू झाल्यावर प्रवाशांचा ओढा तिकडे वाढेल. परिणामी, ऑटो चालकांचे उत्पन्न बुडणार असून बँकांचे हप्ते कसे फेडायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. यामुळे केवळ ऑटो चालकच नाही, तर कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्थांची वसुलीही धोक्यात येण्याची शक्यता आहे.

### शहरात धावणाऱ्या ग्रामिण ऑटोंचे काय?

# अकोला शहरात अनेक ठिकाणी दूषित पाणीपुरवठा

## अनेकांना पोटाचे विकार, मनपाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला**: अकोला शहरात प्रदूषित पाणी पुरवठा होत असल्याची नागरिकांची ओरड आहे. या प्रदूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दूषित पाणी पुरवठ्याने अनेकांना पोटाचे विकार वाढले असून लहान मुले वृध्दांना याचा सर्वाधिक त्रास आहे.

अकोला शहरातून एक अत्यंत चिंताजनक आणि नागरिकांच्या आरोग्याशी जोडलेली बातमी समोर येत आहे. अकोला शहरात गेल्या काही दिवसांपासून अनेक भागांत प्रचंड दूषित आणि प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. या दूषित पाण्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, अनेकांना पोटाच्या विकारांनी ग्रासले आहे.

महापालिकेच्या जलप्रदाय विभागाचे या गंभीर समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असून, आता तरी अधिकाऱ्यांनी जागे होऊन यावर तात्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अकोला महानगरपालिका नागरिकांना शुद्ध पाणी पुरवण्यात पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचा आरोप आता नागरिक करू लागले आहेत.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये नळांना येणारे पाणी हे गढूळ, दुर्गंधीयुक्त आणि रासायनिक दृष्ट्या प्रदूषित असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. हे पाणी प्यायल्यामुळे अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात आले असून, शहरातील खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमध्ये पोटाचे विकार, गॅस्ट्रो, आणि उलट्या-जुलाबाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे.




### केंद्रीय विद्यालयाची प्रवेश प्रक्रिया सुरु

**अकोला**: अकोल्यात नव्याने सुरू होत असलेल्या केंद्रीय विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पहिली ते पाचवीच्या प्रवेश प्रक्रियेला आज पासून सुरुवात झाली. विशेष म्हणजे ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने पार पडणार असून, यामध्ये एकूण २०० जागा उपलब्ध असणार आहेत. केंद्र सरकारच्या दर्जेदार शिक्षण प्रणालीचा लाभ आता अकोल्यातील विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी पहिली ते पाचवीसाठी प्रत्येकी एक तुकडी सुरू केली जात असून, प्रत्येक वर्गाची क्षमता ४० विद्यार्थी इतकी असेल.

# आमच्याकडे कोणतीही डील आलेली नाही !

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई** : आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारकडून संसदेत मांडल्या जाणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पाठिंबा देणार असल्याच्या सर्व चर्चा निराधार आहेत. आमच्याकडे या विधेयकासंदर्भात कोणतीही नवीन डिल आलेली नाही. तसा प्रस्ताव आल्यास आम्ही त्यावर अभ्यास करुन २४ तासांमध्ये भूमिका मांडू, अशी स्पष्टोक्ती खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली. त्या बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.



आज सकाळपासून शरद पवारांची राष्ट्रवादी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारची साथ देत मतदारसंघ पुनर्रचना घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देणार असल्याची जोरदार चर्चा रंगली होती.

# तिकीट बुकिंगमधील 'कॅप्चा कोड'ची कटकट मिटणार!

## रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा

## आयआरसीटीसी संकेतस्थळात महत्त्वाचे बदल

प्रतिनिधी १५ जुलै

**पुणे** : रेल्वे तिकिटाचे ऑनलाईन आरक्षण करताना येणारे अनावश्यक पॉपअप्स, वारंवार भरावा लागणारा कॅप्चा आणि तिकीट बुक होण्यासाठी लागणारा प्रदीर्घ वेळ यामुळे त्रस्त झालेल्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. प्रवाशांचा हा त्रास कायमचा दूर करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आयआरसीटीसीच्या तिकीट बुकिंग सुविधेत आमूलाग्र बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. तिकीट बुकिंगची प्रक्रिया अधिक सोपी, वेगवान आणि सुरक्षित करण्यासाठी आयआरसीटीसीच्या संकेतस्थळाची एक सुधारित 'बीटा आवृत्ती' तयार करण्यात आली असून, ती लवकरच प्रवाशांच्या सेवेत येणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

काही दिवसांपूर्वी जयपूर येथील 'मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या विद्यार्थ्यांनी आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावरील अनेक गंभीर त्रुटी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. यानंतर रेल्वेने तातडीने पावले उचलत १५ जुलैपर्यंत या संकेतस्थळात सुधारणा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, आयआरसीटीसी आणि रेल्वे सूचना प्रणाली केंद्राच्या अधिकाऱ्यांनी जयपूरमध्ये या विद्यार्थ्यांसमोर नवीन संकेतस्थळाची बीटा आवृत्ती सादर केली असून त्यावर विद्यार्थ्यांचे अभिप्राय मागवले आहेत.



### अत्याधुनिक संकेतस्थळाचे आज अनावरण

» प्रवाशांना रेल्वे तिकिटाचे आरक्षण करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी 'इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन' (आयआरसीटीसी) १५ जुलै रोजी आपल्या नवीन आणि अत्याधुनिक संकेतस्थळाचे अनावरण करणार आहे. नव्या वेबसाईटमुळे प्रवाशांना जलद गतीने तिकिट बुक करता येईल, बुकिंगची क्षमता वाढेल आणि विशेषतः 'तत्काळ' बुकिंग दरम्यान होणारा मनस्ताप कायमचा दूर होईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

### असे असणार नव्या संकेतस्थळातील बदल

» कॅप्चा आणि पॉपअप्स हद्दपार, जागांची उपलब्धता एकाच स्क्रीनवर, फास्ट बुकिंग सुविधा, एकदाच भरावी लागणार माहिती.

### आरक्षण यंत्रणेतही होणार बदल

» आयआरसीटीसीचे हे नवीन संकेतस्थळ रेल्वेच्या जवळपास ४० वर्षे जुन्या 'पॅसेंजर रिझर्व्हेशन इंजिन' या प्रणालीशी जोडण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. ही जुनी आरक्षण यंत्रणा देखील समांतर पद्धतीने पूर्णपणे अपडेट केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण क्षमतेने काम करणारे हे नवीन आयआरसीटीसी पोर्टल पुढील काही महिन्यांत अधिकृतपणे लाँच केले जाईल, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### ॲपने ४ कोटी डाउनलोडचा टप्पा केला पार

» रेल्वेच्या अधिकृत 'रेलवन' या ॲपने ४ कोटी डाउनलोड्सचा टप्पा पार केला असून, ते देशातील सर्वात मोठे रेल्वे तिकिट बुकिंग ॲप बनले आहे. या ॲपवर तत्काळ बुकिंगच्या वेळी होणारा 'बॉट्स'चा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठीही रेल्वे विशेष सुरक्षा यंत्रणा राबवत आहे. हे सर्व महत्त्वाचे बदल मालवीय नॅशनल इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण सूचनांमुळेच शक्य झाल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी आवर्जून नमूद केले.

# एकनाथ शिंदे रात्री दिल्लीत अमित शाहांसोबत बैठक!

## दोन मंत्रिपदांची चिन्हं, महाराष्ट्राबाबत महत्त्वाची चर्चा

प्रतिनिधी १५ जुलै

**मुंबई** : केंद्रीय मंत्रिमंडळातील बहुचर्चित फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री उशिरा नवी दिल्लीत दाखल झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची त्यांनी भेट घेऊन चर्चा केली. यावेळी 'शिवसेना उबाठा'मधून फुटून शिवसेनेत आलेले सहा खासदारही शिंदे यांच्यासोबत होते. शिवसेनेला या विस्तारात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि एक राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात असून कॅबिनेटमध्ये खासदार श्रीकांत शिंदे, तर राज्यमंत्रिपदी ओमराजे निंबाळकर आणि संजय जाधव यांची नावे चर्चेत आहेत.

लोकसभेत संख्याबळ वाढलेल्या शिवसेनेला या विस्तारात एक कॅबिनेट मंत्रिपद आणि एक राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संसदेचे अधिवेशन सोमवारपासून सुरू होणार असून, त्यापूर्वी मंत्रिमंडळात फेरबदल होऊ शकतो. शिवसेना उबाठा, आम आदमी पक्ष व तृणमूल काँग्रेसमध्ये अलीकडेच झालेल्या फुटीच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित मंत्रिमंडळ विस्तारात या तिन्ही पक्षांच्या फुटीर गटांतील नेत्यांना केंद्रात मंत्रिपदे मिळण्याची चर्चा आहे.

### महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार असणारा पक्ष

दिल्लीस रवाना होण्यापूर्वी शिंदे यांनी पक्षाचे वरिष्ठ नेते आणि कॅबिनेट मंत्र्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार आणि राज्यातील रखडलेल्या महामंडळ विस्तारावर चर्चा झाल्याचे समजते. उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील सहा बंडखोर खासदार शिवसेनेत सहभागी झाल्याने शिवसेना खासदारांची संख्या १३ वर गेली आहे. यामुळे तो महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार असणारा पक्ष ठरला आहे.

### 206 कनिष्ठ महाविद्यालयाचे सांकेतांक गोठवले!

**संभाजीनगर** : राज्य मंडळाच्या वतीने मार्च २०२६मधील बारावी परीक्षेत मंडळाची विषय मान्यता नसतानाही दोनशेपेक्षा अधिक महाविद्यालयांनी 'संगणकशास्त्र', 'इलेक्ट्रॉनिक्स', 'पीकशास्त्र' अशा विषयांसाठी विद्यार्थी परीक्षेला बसवल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

निकालप्रक्रियेनंतर आता छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळाने विभागातील अशा २०६ महाविद्यालयांचे मंडळ सांकेतांक गोठविण्याची कारवाई सुरू केली आहे. विद्यार्थ्यांना याचा कोणताही फटका बसणार नाही.

बारावीच्या परीक्षेत अनेक महाविद्यालयांनी मंडळाची पूर्वपरवानगी न घेताच 'संगणकशास्त्र', 'इलेक्ट्रॉनिक्स' सारख्या विषयांचे विद्यार्थी बसवले. याबाबत विभागीय मंडळाने २०६ महाविद्यालयांवर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. अशा महाविद्यालयांची यादीही मंडळाने जाहीर केली.

**भारतात परतल्यावर अनेकांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न अधुरे!**



# स्वस्तात एमबीबीएस करण्यासाठी परदेश गाठतात?

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (एनएमसी) नियमानुसार परदेशातून एमबीबीएस केलेल्या प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याला भारतात डॉक्टर म्हणून नोंदणी करण्यासाठी एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. परंतु या परीक्षेतील निकाल सातत्याने धक्कादायक राहिले आहेत.

मुंबई: भारतात सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील मर्यादित जागा, खासगी शिक्षणाचा प्रचंड खर्च आणि डॉक्टर होण्याची तीव्र इच्छा यामुळे दरवर्षी हजारो भारतीय विद्यार्थी रशिया, जॉर्जिया, कझाकस्तान, किर्गिझस्तान, उझबेकिस्तान, फिलिपिन्स, चीन आणि नेपाळसारख्या देशांत एमबीबीएसचे शिक्षण घेण्यासाठी जातात. मात्र परदेशातून पदवी घेऊन भारतात परतल्यानंतर त्यांच्यासमोर उभी राहणारी फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन (एफएमजीई) ही परीक्षा अनेकांची स्वप्ने उद्ध्वस्त करत असल्याचे गेल्या काही वर्षांतील आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (एनएमसी) नियमानुसार परदेशातून एमबीबीएस केलेल्या प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याला भारतात डॉक्टर म्हणून नोंदणी करण्यासाठी एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. परंतु या परीक्षेतील निकाल सातत्याने धक्कादायक राहिले आहेत. अनेक सत्रांमध्ये दहा विद्यार्थ्यांपैकी केवळ एक किंवा दोनच विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. याचा अर्थ परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले तरी भारतात डॉक्टर म्हणून काम करण्याची हमी मिळत नाही.

गेल्या काही वर्षांतील एफएमजीईच्या निकालांचा आढावा घेतल्यास २०२१ मध्ये उत्तीर्णतेचे प्रमाण २४.५४ टक्के होते. २०२२ मध्ये ते २३.३५ टक्क्यांवर आले. जून २०२३ मध्ये हा दर केवळ १०.२० टक्क्यांवर घसरला. डिसेंबर २०२३ मध्ये २०.५७ टक्के, जून २०२४ मध्ये २०.८९ टक्के, जून २०२५ मध्ये १८.६१ टक्के, डिसेंबर २०२५ मध्ये २३.९० टक्के, तर जून २०२६ मध्ये पुन्हा फक्त १२.७७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. म्हणजेच गेल्या सहा-सात वर्षांत उत्तीर्णतेचा दर बहुतांश वेळा १० ते २५ टक्क्यांच्या दरम्यानच राहिला आहे.ही आकडेवारी केवळ विद्यार्थ्यांच्या अपयशाची नाही, तर परदेशातील वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जाबाबत आणि भारतातील परवाना परीक्षेतील गुणवत्तेच्या निकषांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करते.

तज्ज्ञांच्या मते, सर्वात मोठी समस्या म्हणजे अभ्यासक्रमातील तफावत. अनेक देशांतील एमबीबीएस अभ्यासक्रम भारतातील वैद्यकीय शिक्षणाशी पूर्णपणे सुसंगत नसतो. काही ठिकाणी क्लिनिकल प्रशिक्षण अत्यंत मर्यादित असते, तर काही महाविद्यालयांमध्ये रुग्णांशी प्रत्यक्ष काम करण्याची संधी कमी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांकडे पदवी असली तरी भारतीय वैद्यकीय व्यवस्थेत आवश्यक असलेले व्यावहारिक ज्ञान कमी पडते.कोविड-१९ काळात हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन झाले. अनेकांना महिनोन्?महिने क्लिनिकल पोस्टिंगच मिळाले नाही. त्याचा परिणाम आजही निकालांमध्ये दिसत असल्याचे शिक्षणतज्ज्ञ सांगतात.<भारतात खासगी वैद्यकीय शिक्षणासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च येऊ शकतो. त्याच्या तुलनेत परदेशात २० ते ४० लाख रुपयांत एमबीबीएस पूर्ण होत असल्याने अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे हा पर्याय स्वीकारतात. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एफएमजीई मध्ये वारंवार अपयश आल्यास विद्यार्थ्यांची अनेक वर्षे वाया जातात. त्यांना पुन्हा पुन्हा परीक्षा द्यावी लागते, आर्थिक ताण वाढतो आणि मानसिक तणावालाही सामोरे जावे लागते.

परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवून देणाऱ्या अनेक एजन्सी ‘१०० टक्के यश’, ‘सोपे शिक्षण’ किंवा ‘भारतात सहज प्रॅक्टिस’ अशा आकर्षक दाव्यांनी विद्यार्थ्यांना भुरळ घालतात. मात्र एफएमजीई च्या प्रत्यक्ष निकालांकडे पाहिले असता हे दावे वास्तवाशी विसंगत असल्याचे दिसते. त्यामुळे केवळ कमी शुल्क किंवा सुलभ प्रवेश न पाहता संबंधित विद्यापीठाचा एफएमजीई निकाल, एनएमसी ची मान्यता, क्लिनिकल प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि माजी विद्यार्थ्यांचा अनुभव तपासणे अत्यावश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने परदेशी वैद्यकीय शिक्षणासाठी काही कठोर निकष लागू केले असले, तरी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली नाही. उलट नीट उत्तीर्ण होऊनही भारतात जागा न मिळाल्याने अनेक विद्यार्थी परदेशाचा पर्याय निवडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, मान्यताप्राप्त विद्यापीठांची माहिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत जागरूक करणे ही काळाची गरज बनली आहे.एफएमजीई चा सातत्याने कमी राहणारा निकाल हा केवळ एका परीक्षेचा मुद्दा नाही. तो भारतातील वैद्यकीय शिक्षण व्यवस्था, परदेशातील शिक्षणाची गुणवत्ता आणि हजारो विद्यार्थ्यांच्या करिअरशी थेट संबंधित असलेला गंभीर धोरणात्मक प्रश्न बनला आहे.

# 20 व्या शतकातील मराठी रंगभूमीवर अद्वितीय नट-गायक!

नारायण श्रीपाद राजहंस यांचा स्मृतिदिन

नारायण श्रीपाद राजहंस, ऊर्फ बालगंधर्व यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील नागठाणे येथे २६ जून १८८८ मध्ये झाला. तर मृत्यू पुणे येथे १५ जुलै १९६७ रोजी झाला. ते ‘बालगंधर्व’ या नावाने अधिक लोकप्रिय असलेले विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील मराठी रंगभूमीवरील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते होते. रंगभूमीवर स्त्रिया अभिनय करीत नसतानाच्या काळात आपल्या हुबेहूब रंगवलेल्या स्त्री-भूमिकांमुळे बालगंधर्वांनी मोठी लोकप्रियता मिळवली. नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यांसारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरूबंधू होत. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांचे गाणे ऐकून बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना बालगंधर्व ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले.



बालगंधर्वांची रंगभूमीवरील आपली कारकीर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत इ.स. १९०५ साली आरंभली. मात्र तिचे एक भागीदार नानासाहेब जोगळेकर यांच्या इ.स. १९११ मध्ये निधनानंतर संस्थेत वाद झाले. परिणामी इ.स. १९१३ मध्ये बालगंधर्वांनी, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस आणि गोविंदराव टेंबे यांच्यासह ती संस्था सोडली आणि गंधर्व संगीत मंडळीची स्थापना केली. मात्र इ.स. १९२१ मध्ये कर्जात अडकलेल्या या नव्या कंपनीचे नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व हे एकमेव मालक होते. त्यानंतर त्यांच्या नाटकांनी मिळवलेल्या लोकप्रियतेच्या जोरावर त्यापुढच्या सात वर्षांत कंपनीने सर्व देणी फेडली. मात्र त्यापुढच्या काळात या संस्थेची आर्थिक स्थिती चढउताराचीच राहिली. नाटकाच्या प्रॉपर्टीसह अनेक गोष्टींमध्ये दर्जा आणि अस्सलपणा राखण्याचा बालगंधर्वांचा आग्रह हेही त्याचे एक कारण सांगितले जाते. पुढे प्रभात फिल्म कंपनीसाठी बालगंधर्वांनी ‘धर्मात्मा’ चित्रपटात संत एकनाथांची भूमिकाही केली. बालगंधर्वांनी आपल्या भूमिका साकारून संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय केले. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली.

भाऊराव कोल्हटकरांच्या इ.स. १९०१ मधील निधनानंतर जेंव्हा संगीत नाटक परंपरेला उतरती कळा आली, त्यानंतर बालगंधर्वांनी या परंपरेत मोलाची भर घालत ती पुढे नेण्याचे महत्त्वाचे कार्य केले. इ.स. १९२९ सालच्या ४२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. स्त्री भूमिकांसाठी महिला कलाकारांची गरज निर्माण झाल्यानंतर एप्रिल इ.स. १९३८ मध्ये गोहर कर्नाटकी यांचा गंधर्व नाटक मंडळीत समावेश झाला. गोहरबाईंनी त्यानंतर कंपनीचा कारभार सांभाळण्यातही सहभाग दिला. इ.स. १९५१ मध्ये नारायणरावांनी गोहरबाईंशी कायदेशीर विवाह केला. इ.स. १९६७ मध्ये बालगंधर्वांचा मृत्यू झाला.

त्यांनी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर (नाटक), संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला, संगीत कान्होपात्रासह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या. त्यांची संगीत शाकुंतल नाटकातील ‘शकुंतला’ व मानापमान नाटकातील ‘भामिनी’ या भूमिकांमुळे एक प्रतिभावंत कलाकार म्हणून त्यांचे नाव सर्वत्र झाले. इ.स. १९५५ रोजी त्यांनी एकच प्याला नाटकात साकार केलेली सिंधू ही त्यांची शेवटची भूमिका ठरली. त्यानंतर त्यांनी रंगभूमीवरून निवृत्ती घेतली. बालगंधर्वांच्या रंगभूमीवरल्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल ‘रत्नाकर’ मासिकाने १९३१ मधल्या जुलैचा अंक ‘गंधर्व अंक’ काढला होता. त्यानिमित्ताने ‘बालगंधर्वांची सर्वोत्कृष्ट भूमिका कोणती?’ असा प्रश्न वाचकांना विचारून सर्वेक्षण केले होते. तेव्हा वाचकांनी त्यांच्या ‘एकच प्याला’मधल्या सिंधूला सर्वाधिक पसंती दिली होती.

# प्रख्यात प्रिंटमेकर, शिल्पकार : कृष्णा रेड्डी

कृष्णा रेड्डी यांचा जन्म १५ जुलै १९२५ रोजी भारतातील आंध्र प्रदेशातील चित्तूरजवळ असलेल्या नंदनूर नावाच्या एका छोट्या गावात झाला. त्यांचे वडील एक शेतमजूर होते, जे मंदिरांमध्ये भित्तिचित्रे देखील रंगवत असत. रेड्डी यांनी १९४१ ते १९४६ या काळात विश्व-भारती विद्यापीठाच्या कला भवनात (ललित कला संस्था) नंदलाल बोस यांच्यासोबत शिक्षण घेतले आणि ललित कलेत पदवी प्राप्त केली. १९४७ ते १९४९ या काळात ते कलाक्षेत्र फाउंडेशनमध्ये कला विभागाचे प्रमुख होते आणि मद्रासमधील मॉन्टेसरी शिक्षक प्रशिक्षण केंद्रात कला शिकवत होते. याच काळात त्यांना शिल्पकला आणि चित्रकलेत रस निर्माण झाला. १९४९ मध्ये, ते लंडनला गेले आणि लंडन विद्यापीठाच्या स्लेड स्कूल ऑफ फाइन आर्ट्समध्ये हेन्री मूर यांच्याकडे शिल्पकलेचा अभ्यास सुरू ठेवला. १९५० मध्ये, रेड्डी पॅरिसला गेले आणि कलाकार कॉन्स्टँटिन ब्रँकुसी यांना भेटले . ब्रँकुसी यांच्यामुळे त्यांची कलेवरील कॅफे चर्चांशी ओळख झाली आणि स्टुडिओ भेटीदरम्यान ते अनेक प्रसिद्ध कलाकारांना भेटले. पॅरिसमधील वास्तव्यादरम्यान त्यांनी ओसिप झाडकिन यांच्याकडे शिल्पकला आणि स्टॅनले विल्यम हेयटर यांच्याकडे कोरीवकाम यांचा अभ्यास केला.



१९५७ मध्ये, त्यांनी मारिनो मारिनी यांच्या हाताखाली शिक्षण घेण्यासाठी मिलानमधील अकॅडेमिया दि बेले आर्टी दि ब्रेरा (ब्रेरा अकादमी) येथे प्रवास केला. २०१६ मध्ये ते मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्टमधील ‘वर्कशॉप अँड लेगसी: स्टॅनले विल्यम हेयटर, कृष्णा रेड्डी, झरिना हाश्मी’ या प्रदर्शनातील विषयांपैकी एक होते. त्यांचे कार्य वॉशिंग्टन, डीसी येथील नॅशनल गॅलरी ऑफ आर्टच्या कायमस्वरूपी संग्रहात आढळू शकते.

रेड्डी यांना इंटॅग्लिओ प्रिंटमेकिंगमधील एक मास्टर मानले जात होते आणि १९६५ नंतर ते हेटरच्या अटेलियर १७ मध्ये सहयोगी संचालक होते. अटेलियर १७, एक भरभराटीला आलेली कलाकारांची कार्यशाळा, १९२७ मध्ये हेटरने स्थापन केली होती आणि ती मूळतः पॅरिसमध्ये होती; तथापि, १९३९ आणि १९४० दरम्यान ही कार्यशाळा न्यूयॉर्क शहरात आणि १९५० मध्ये पुन्हा पॅरिसला हलवण्यात आली. अटेलियर १७ हे जोन मिरो , पाब्लो पिकासो , अल्बर्टो जियाकोमेटी , जुआन कार्डेनास , कॉन्स्टँटिन ब्रँकुसी आणि झरिना हाश्मी यांसारख्या युरोपियन आणि अमेरिकन कलाकारांसाठी त्यांच्या कला पद्धतींमध्ये प्रयोग करण्याचे नेहमीच एक भेटीचे ठिकाण राहिले आहे.

रेड्डींच्या तंत्र आणि शैलीने त्यांना एक महत्त्वाचे प्रिंटमेकर म्हणून ओळख मिळवून दिली. रेड्डींचे प्रिंट्स अमूर्त असून, ते गुंतागुंतीच्या टेक्स्चरायझेशन असलेल्या प्लेट्सवर सूक्ष्म ग्रिड-सारख्या डिझाइनने तयार केलेले आहेत. त्यांनी प्रिंट्समध्ये सादर केलेले असंख्य गुंतागुंतीचे रंग निसर्गाच्या अनंत रहस्यांकडे पाहण्याच्या चिंतनशील दृष्टिकोनातून दिसून येतात. अटेलियर १७ मध्ये काम करत असताना, रेड्डींनी शाईच्या चिकटपणा आणि स्निग्धतेचा उपयोग करून एकाच प्रिंटिंग मॅट्रिक्समधून बहु-रंगीत प्रिंट्स तयार करण्यासाठी एक नवीन छपाई प्रक्रिया विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याला नंतर व्हिस्कोसिटी प्रिंटिंग असे नाव देण्यात आले. रेड्डींनी नंतर न्यूयॉर्कमधील रॉबर्ट ब्लॅकबर्नच्या प्रिंटमेकिंग वर्कशॉपमध्ये व्हिस्कोसिटी एचिंग तंत्र शिकवले. कला क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल रेड्डी यांना १९७२ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रेड्डी हे अमेरिकेतील मेरीलँड इन्स्टिट्यूट कॉलेज ऑफ आर्ट, प्रॅट इन्स्टिट्यूट , रस्किन कॉलेज स्कूल ऑफ फाइन आर्ट अँड ड्रॉइंग, टेक्सास विद्यापीठ आणि इतर अनेक विद्यापीठांमध्ये अतिथी प्राध्यापक आणि व्याख्याते होते. रेड्डींच्या विद्यार्थ्यांमध्ये कॅथलीन मेरी स्पॅग्नोलो आणि इलेन ब्रेगर या कलाकारांचा समावेश आहे. रेड्डी यांचे २२ ऑगस्ट २०१८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले.

# युवकांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करून आत्मनिर्भर बनवा!

दरवर्षी १५ जुलै रोजी ‘जागतिक युवा कौशल्य दिन’ साजरा केला जातो. तरुणांना रोजगार, उद्योजकता आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनवणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने डिसेंबर २०१४ मध्ये ठराव संमत करून १५ जुलै हा दिवस जागतिक युवा कौशल्य दिन म्हणून घोषित केला. त्यानंतर २०१५ पासून जगभरात हा दिवस विविध उपक्रमांनी साजरा केला जात आहे. सध्याच्या डिजिटल युगात केवळ शैक्षणिक पदवी असणे पुरेसे नाही, तर रोजगाराच्या नवीन संधी मिळवण्यासाठी व्यावहारिक आणि तांत्रिक कौशल्यांची जोड असणे आवश्यक आहे. कौशल्य विकासाच्या माध्यमातून बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे, युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी (उद्योजकता) प्रेरित करणे आवश्यक आहे. भारतात २०१५ मध्ये सुरू झालेल्या या अभियानांतर्गत आयटीआय आणि इतर संस्थांमार्फत तरुणांना विविध क्षेत्रांचे प्रशिक्षण दिले जाते

तरुणांना रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी कौशल्यांनी सुसज्ज करण्याच्या धोरणात्मक महत्त्वाचा गौरव करण्यासाठी, २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने १५ जुलै हा ‘जागतिक युवा कौशल्य दिन’ म्हणून घोषित केला. कामाचे जग झपाट्याने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित संक्रमण आणि वाढती सामाजिक गुंतागुंत यांमुळे आपण कसे शिकतो, काम करतो आणि समाजात कसे सहभागी होतो, यात परिवर्तन घडत आहे. या बदलत्या परिस्थितीत यशस्वी होण्यासाठी, तरुणांना केवळ तांत्रिक कौशल्यांपेक्षा अधिकची गरज आहे. त्यांना अशा संतुलित क्षमतांच्या संचाची आवश्यकता आहे, ज्यात तांत्रिक, डिजिटल, एआय, हरित, सामाजिक-भावनिक आणि नागरी कौशल्यांसोबतच अशा मानवी गुणांचाही समावेश असेल, ज्यांची जागा तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.

‘सामायिक भविष्यासाठी कौशल्ये’ या संकल्पनेअंतर्गत, या वर्षीच्या जागतिक युवा कौशल्य दिनाच्या उपक्रमांमध्ये नाविन्यपूर्ण युवा कौशल्य कार्यक्रमांच्या तातडीच्या गरजेवर प्रकाश टाकला जाईल. असे उपक्रम जे तरुणांना केवळ जुळवून घेण्यासच नव्हे, तर सहानुभूतीने नेतृत्व करण्यास, सांस्कृतिक दरी सांधण्यास, लवचिकता निर्माण करण्यास आणि अधिक शाश्वत व सर्वसमावेशक उद्याला सक्रियपणे आकार देण्यास सक्षम करतील. युनेस्को-युनेवोक द्वारे आयोजित हा वेबिनार, सरकार, शिक्षणतज्ञ, नियोक्ते आणि तरुणांना एका महत्त्वपूर्ण प्रश्नावर विचार करण्यासाठी एकत्र आणतो. ‘सामायिक भविष्यात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक तरुणाला आवश्यक असलेल्या क्षमतांनी सुसज्ज करण्यासाठी काय करावे लागेल’



आज जागतिक युवा कौशल्य दिन

**जागतिक युवा कौशल्य दिन महत्त्वाचा का आहे?**

जगभरात तरुण बेरोजगारी हे एक मोठे आर्थिक आणि सामाजिक आव्हान आहे. आयएलओच्या ‘ ग्लोबल एम्प्लॉयमेंट ट्रेंड्स फॉर यूथ २०२४’ नुसार , २०२३ मध्ये जागतिक तरुण बेरोजगारीचा दर १५ वर्षांतील नीचांकी पातळीवर म्हणजेच १३ टक्केपर्यंत खाली आला, जो महामारीपूर्वीच्या १३.८ टक्क्याच्या पातळीपेक्षाही कमी आहे. तथापि, ही सुधारणा असमान राहिली आहे. अरब देश, पूर्व आशिया आणि दक्षिण-पूर्व आशियामध्ये, २०२३ मधील दर २०१९ पेक्षा जास्त होते. दरम्यान, जागतिक स्तरावर प्रत्येक पाच तरुणांपैकी एक जण आणि एक चतुर्थांशपेक्षा जास्त तरुण स्त्रिया एनईईटी (रोजगार, शिक्षण किंवा प्रशिक्षणात नसलेल्या) होत्या, आणि तरुण स्त्रियांचा एनईईटी दर (२८.१ टक्के) तरुण पुरुषांच्या दरापेक्षा (१३.१ टक्के) दुप्पटीहून अधिक होता.

जे काम करतात त्यांच्यासाठीही चांगल्या नोकऱ्या दुर्मिळ आहेत. निम्म्याहून अधिक तरुण कामगार अनौपचारिक रोजगारात आहेत आणि कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, चारपैकी तीन जण केवळ स्वयंरोजगार किंवा तात्पुरत्या नोकऱ्या करतात. हरित आणि नील क्षेत्रांमधील गुंतवणुकीमुळे २०३० पर्यंत ८४ लाख तरुणांसाठी नोकऱ्या निर्माण होऊ शकतात, परंतु या नोकऱ्या चांगल्या कामाच्या परिस्थितीसह मिळायला हव्यात. ज्यामध्ये समान वेतन, सामूहिक वाटाघाटी आणि छळापासून संरक्षण यांसारख्या मूलभूत हक्कांचा समावेश आहे.

**तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणाची भूमिका काय असते?**

२०३० अजेंडा साध्य करण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण हे केंद्रस्थानी आहेत. इंचिओन जाहीरनाम्यातील ‘शिक्षण २०३०’ ही संकल्पना शाश्वत विकास ध्येय ४, ‘सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि न्याय्य दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करणे आणि आजीवन शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे’ यामध्ये पूर्णपणे सामावलेली आहे. ‘शिक्षण २०३०’ मध्ये तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्य विकासावर, विशेषतः परवडणाऱ्या दर्जेदार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाच्या उपलब्धतेवर; रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी तांत्रिक व व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करण्यावर; लैंगिक विषमतेचे निर्मूलन करण्यावर आणि दुर्बळ घटकांना संधी सुनिश्चित करण्यावर लक्षणीय भर दिला आहे. या संदर्भात, टीव्हीईटीकडून आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय स्वरूपाच्या अनेक मागण्या पूर्ण करण्याची अपेक्षा आहे. याद्वारे युवक आणि प्रौढांना रोजगार, सन्मानजनक काम आणि उद्योजकतेसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे, न्याय्य, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देणे, तसेच हरित अर्थव्यवस्था आणि पर्यावरणीय शाश्वततेकडे होणाऱ्या संक्रमणास पाठिंबा देणे अपेक्षित आहे.

व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण (टीव्हीईटी) युवकांना रोजगाराच्या जगात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांनी सुसज्ज करू शकते, ज्यामध्ये स्वयंरोजगारासाठीच्या कौशल्यांचाही समावेश आहे. टीव्हीईटी कंपन्या आणि समुदायांकडून बदलत्या कौशल्यांच्या मागण्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता सुधारू शकते, उत्पादकता वाढवू शकते आणि वेतनाची पातळी वाढवू शकते. टीव्हीईटी रोजगाराच्या जगात प्रवेशातील अडथळे कमी करू शकते, उदाहरणार्थ, कार्य-आधारित शिक्षणाद्वारे आणि प्राप्त केलेल्या कौशल्यांना मान्यता व प्रमाणपत्र मिळेल याची खात्री करून. टीव्हीईटी कमी-कुशल, अर्ध-बेरोजगार किंवा बेरोजगार व्यक्ती, शाळाबाह्य युवक आणि शिक्षण, रोजगार व प्रशिक्षणात नसलेल्या व्यक्तींनाही कौशल्य विकासाच्या संधी देऊ शकते.

# महाराष्ट्रातील जल प्रकल्पाची स्थिती चिंताजनक



महाराष्ट्रातील जल प्रकल्पांची सद्यस्थिती अत्यंत चिंताजनक व असमान आहे. पावसाचे असमान वितरण आणि अपुऱ्या नियोजनामुळे अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मराठवाडा (उदा. जालना, बीड) व उत्तर महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प कोरडे पडले आहेत, तर पुणे विभागातील काही धरणांमध्ये समाधानकारक जलसाठा आहे.

राज्यातील जल प्रकल्पांच्या स्थितीचा महत्त्वाचा आढावा खालीलप्रमाणे आहे: मराठवाडा व विदर्भ (तीव्र टंचाई)जालना: जिल्ह्यातील ६७ पैकी तब्बल ३४ लघु प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा शून्य झाला आहे. एकूण साठा केवळ १२.४६ टक्क्यांवर आला आहे.धाराशिव: जिल्ह्यातील २२५ प्रकल्पांपैकी २३ प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत, तर लोअर तेरणा व मांजरा या प्रमुख धरणांमधील साठा अनुक्रमे ३२% व १७% च्या आसपास आहे.२. पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र (मिश्र स्थिती) उजनी धरण: सोलापूरची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाणीपातळी घटून उपयुक्त साठा उणे (मायनस) पातळीत गेला आहे.पुणे व सातारा धरणसाखळी: कोयना आणि खडकवासला साखळी प्रकल्पांमध्ये पावसाच्या आगमनानंतर पाणीसाठ्यात वाढ होत असली, तरी बाष्पीभवन आणि अनियमित पावसामुळे जलव्यवस्थापनाचे आव्हान कायम आहे.३. उपलब्ध पाण्याचे असमान वितरणराज्यातील एकूण उपलब्ध पाण्याच्या (४४४७.८ टीएमसी) ५५ टक्के पाणी एकट्या कोकणात उपलब्ध आहे. याउलट, सह्याद्रीच्या पूर्वेकडील पर्जन्यछायेच्या प्रदेशात (मराठवाडा, सोलापूर, अहमदनगर) पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याने जल प्रकल्पांची स्थिती दरवर्षी बिकट बनते.४. महत्त्वाचे जलविषयक निर्णयप्रलंबित असलेल्या नर्मदा पाणी वाटपाचा तिढा सुटल्यामुळे महाराष्ट्राला आता नर्मदा नदीतून १० टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. १५ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# निर्गुणा नदीवरील पूल वाहन बनला धोक्याचा

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी १५ जुलै



**आलेगाव :** गत वर्षी आलेगाव येथील निर्गुणा नदीला आलेल्या महापुरामुळे,पुलाचे संपूर्ण संरक्षण कठडे आणि पुलाच्या समोरील सडके खालील भर वाहून गेल्याने वाहन चालक आणि प्रवाशांकरिता सदर पूल धोक्याचा बनला असून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरामध्ये गत वर्षी पावसाने धुमाकूळ घातला असता निर्गुणा नदीला महापूर आला होता.या पुरामुळे,आलेगाव डोणगाव रस्त्यावर असलेल्या निर्गुणा नदीवरील पुलाचे संरक्षण कठडे आणि पुला समोरील सडके खालील भर वाहून गेल्याने रस्ता आणि पूल वाहन चालका सह प्रवाशांकरिता धोक्याचा बनला आहे. या संदर्भामध्ये विविध वृत्तपत्रांमधून वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. त्या नुसार संबंधित अधिकाऱ्यांनी दोन ते तीन वेळेस प्रत्यक्ष पाहणी केली आणि पुरामुळे सडकेवर पडलेल्या खड्डयांची कंत्राटाद्वारे थाथुर माथुर डागडुजी करण्यात आली.आता तेच खड्डे या वर्षीच्या पावसामुळे उघडे पडण्याची भीती प्रवाशांमध्ये आहे. तसेच पुलावरील संरक्षण कठडे हे वाहन चालकांसह प्रवासी आणि पायी प्रवास करणारे, बैलबंडी धारक शेतकरी आणि पाळीव प्राण्यांना सुरक्षात्मक होते.ते कठडे पुरामुळे वाहून गेल्याने अनेकांच्या सुरक्षेचा प्रश्न उभा ठाकला आहे.जवळपास एक वर्षाचा काळ लोटत आला असताना आणि संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असताना पुलावरील नव्याने सुरक्षा कठड्यांची नितांत गरज असताना अद्याप पावेतो सुरक्षा कठडे बसविण्यात आले नाही.हा संबंधित प्रशासनाचा निष्काळजी पना समोर आला आहे.

### पुलावरून पडून अपघात झाल्यास जबाबदार कोण?

» सद्या पावसाळ्याचे दिवस आहेत. अतिवृष्टी अथवा मुसळधार पावसामुळे निर्गुणा नदीला महापूर आला आणि पुलाला सुरक्षा कठडे नसल्यामुळे, पूर पाहण्यासाठी पुलावर बघ्यांची गर्दी नियमित असते आणि अशा परिस्थिती मध्ये एखाद्याचा तोल जाऊन पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन मृत्यू झाला,तसेच पाळीव प्राणी वाहन चालक अथवा बेलबंडी पाण्याच्या प्रवाहात वाहून अकस्मात घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण राहणार हा प्रश्न मोठा गंभीर असून संबंधित प्रशासनाने वेळीच दखल घेऊन वाहन चालक प्रवासी हित साधत उपाय योजना करण्याची आवश्यकता असताना अद्याप पावेतो का करण्यात आली नाही.असा प्रश्न जनतेतून विचारला जात असून दुर्दैवी घटना घडल्यास संबंधित प्रशासन जबाबदारी घेणार काय असा प्रश्न प्रवासी शेतकरी वाहन चालक तीव्र संतापाने करीत आहेत.

# तालुक्यातील दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना तातडीने मान्यता द्या

## शिवसेनेची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी १५ जुलै



**पातूर :** पातूर तालुक्यातील दुर्गम व ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा मिळण्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांतील रुग्णांना उपचारासाठी लांब अंतराचा प्रवास करावा लागत असल्याने वेळेवर उपचार मिळत नाहीत. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. श्री प्रकाशजी आबिटकर यांच्याकडे पातूर तालुक्यातील आवश्यक ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना तात्काळ मान्यता देण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी व शिवसेना जिल्हा समन्वयक प्रणव तायडे पाटील यांनी केली आहे.

यावेळी त्यांनी सांगितले की, ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे सुरू झाल्यास माता-बालकांच्या आरोग्याची अधिक चांगली काळजी घेता येईल, ज्येष्ठ नागरिकांना उपचारासाठी होणारी गैरसोय कमी होईल आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध होईल.पातूर तालुक्यातील वाढती लोकसंख्या, दुर्गम वस्ती आणि आरोग्य सुविधांची कमतरता लक्षात घेता शासनाने या मागणीची दखल घेऊन आवश्यक त्या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांना प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी मागणी केली आहे.

पातूर तालुक्यात आदिवासींची संख्या बरीच आहे. तसेच दुर्गम भागात राहणा-यांना आरोग्य सोयी सुविधा पासून वंचित राहावे लागते. पावसाळ्यात तर जंगलाने वेढलेला भाग संपर्कापासून तुटलेला असतो. त्यामुळे या भागातील रहिवाशांचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे. त्यांना वैद्यकीय सुविधा मिळाव्यात म्हणून लक्ष वेधले जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र द्वारे सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. प्रत्येकाला उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. शासनाचे देखील हेच धोरण आहे. त्यामुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना चांगली सुविधा उपलब्ध व्हावी याकडे लक्ष वेधण्यात आले. सध्या पावसाळा असल्याने साथीचे आजार लक्षात घेऊन सजग राहणे महत्त्वाचे आहे.

# जिल्हा परिषद शाळेतील मुलांचे भविष्य अंधारात

आजम खान १५ जुलै



**बार्शीटाकळी :** येथील शेतकरी तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी जिल्हा परिषद मराठी मुलांच्या शाळेत शिकतात. परंतु शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ चाललेला दिसतो. कोणतेही नियम नाही. शाळेची वेळ सकाळी 7.30 ते 11 वाजेपर्यंत आहे. परंतु शाळा उघडण्याची वेळ नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात दिसते.

शाळेच्या प्रिन्सिपल अश्विनी सरोदे यांच्याकडे पालकांनी कित्येक वेळा तक्रार केली.

शाळा वेळेत सुरू करा. कारण एकीकडे विद्यार्थी, पालक शाळेत आलेले असतात आणि शाळा बंद असते. घरची कामे बाजूला ठेवून शाळेत पोहचावे लागते. तसेच शाळा उशिरा सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. प्रस्तूत प्रतिनिधीने आज सकाळी 8. 45 वाजता शाळेला भेट दिली. तेव्हा शाळा उघडली नव्हती. शाळेत तीन चार शिक्षक आहेत. त्यातील एका शिक्षकाची बीएलओ म्हणून तहसील कार्यालयामध्ये निवड झाली आहे. ब्युरो चा काम असल्याने तहसील कार्यालय एसआर फॉर्म भरण्यात ते व्यस्त आहेत. शिक्षक व प्रिन्सिपल यांनी साडेसात वाजता शाळा उघडावी अशी पालकांची मागणी आहे. पंचायत समितीकडे तक्रार दिली. मात्र, अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. पालकांनी शेतीची तसेच दैनंदिन कामे करावी की शाळा वेळेत सुरू झाली की नाही याकडे लक्ष द्यावे अशी विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळा नियमित वेळेत सुरू व्हावी अशी अपेक्षा आहे.

## भरधाव दुचाकीची धडक; सात वर्षीय मुलगा जखमी

**उरळ :** बाळापूर तालुक्यातील हाता येथे भरधाव दुचाकी चालवून सात वर्षीय मुलाला धडक दिल्याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध उरळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी किरण प्रमोद कुटे (वय २५, रा.हाता, ता. बाळापूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून राहुल सिद्धार्थ दामोदर (रा. हाता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीनुसार, ११ जुलै रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीचा मुलगा रुद्र प्रमोद कुटे (वय ७) हा त्याचा मित्र शर्यन दामोदर यांच्या घरासमोर खेळत होता. त्यावेळी आरोपीने दुचाकी भरधाव चालवत बालकाला धडक दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अपघातात रुद्रच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत होऊन फ्रैक्चर झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# अभाविप स्थापना दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी १५ जुलै



**बाळापूर :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ७८ व्या स्थापना दिनानिमित्त अ.भा.वि.प आज बाळापूर नगर शाखेच्या वतीने इयत्ता १० वी १२ वी च्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा न.प प्राथमिक मराठी शाळा क्र ८ राजपूतपुरा सभागृह येथे पार पडला.

या समारोहाला प्रमूख अतिथी म्हणुन राष्ट्रीय कला मंच विदर्भ प्रांत प्रमुख अविनाश तोडसाम, विदर्भ प्रांत सहमंत्री चंद्रकांत बोबडे, माऊली कोचिंग क्लासेस चे संचालक दत्तात्रय दळी, निर्वाचन अधिकारी रजत मोरे, नगरमंत्री रितेश उमाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच वर्ष २०२६-२७ ची अ.भा.वि.प बाळापूर नगरची नूतन कार्यकारणी घोषणा करण्यात आली. बाळापूर नगरमंत्री रितेश जी उमाळे नगर सहमंत्री शंकरसिंह ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना प्रोत्साहन देणे अश्या समारोहाच्या माध्यमातुन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे त्यांच्या मध्ये राष्ट्रप्रथम ची भावना निर्माण करणे हेच विद्यार्थी परिषदेचे परम उदेश्य आहे. असे राष्ट्रीय कला मंच विदर्भ प्रांत प्रमुख अविनाश जी तोडसाम यांनी म्हटले तर निव्वळ विद्यार्थ्यांनी शिक्षण पुस्तके वही कुटुंब येवढेच मर्यादित न राहता देशाच्या सर्व स्थितीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे म्हणजे सुशिक्षित नागरिकत्व प्रदान होईल असे विदर्भ प्रांत सहमंत्री चंद्रकांत जी बोबडे यांनी आपले मत व्यक्त केले. सोबत विध्यार्थ्यांनी आपले भवितव्य कशे जागृत करावे त्यासाठी लागेल ती मेहनत परिश्रम घ्यावे पण ध्येय प्राप्त करावे माऊली कोचिंग क्लासेस चे संचालक दळी सर यांनी आपल्या मार्गदर्शनातून मत व्यक्त केले. तर निर्वाचन अधिकारी रजत जी मोरे यांनी वर्ष २०२६ -२७ अ.भा.वि.प नूतन कार्यकारणीची घोषणा करीत विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवित अ.भा.वि.प सदैव कटीबद्ध राहील असा विश्वासही व्यक्त केला.

## कावड यात्रेपूर्वी कावड मार्गावरील पथदिवे सुरू करा – निलेश देव यांची मागणी

**अकोला :** अकोला ते अकोट (कावड मार्ग) या राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकात पथदिवे बसविण्याची मागणी गतवर्षी नगरसेवक निलेश देव यांनी केली होती. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाने मार्गावर विद्युत पोल उभारून पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण केले. मात्र, आजही हे पथदिवे सुरू करण्यात आलेले नाहीत.

या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिनांक ०७ जुलै २०२५ रोजी दिलेल्या पत्रानुसार, दुभाजकातील पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण झाले असून ते अकोला महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे नमूद करण्यात आले होते. परंतु वर्ष उलटूनही प्रत्यक्षात पथदिवे सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.सध्या कावड यात्रेचा कालावधी जवळ आला असून,हजारो शिवभक्त या मार्गावरून पायी प्रवास करणार आहेत.

## "नमस्ते डे" च्या अनुषंगाने स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान



प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला :** 14 जुलै हा दिवस नमस्ते डे म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने 14 जुलै 2026 रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा सहा.आयुक्त गणेश शहाने यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारे स्थानिक खुले नाट्य गृहात महापौर सौ.शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ.आरती घोगलिया, सभागृहनेता पवन महल्ले यांच्या उपस्थितीत 50 उत्कृष्ट कार्य करणा-या स्वच्छता महिला व पुरूष कर्मचा-यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर यांनी केले.

यावेळी मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुरकर, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, अमर खोडे, रौशन अली, शहर समन्वयक सैय्यद अफाक यांचेसह स्वच्छता निरीक्षक आणि स्वच्छता कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## रामभक्तीचा विजय - काँग्रेसलाही राम मंदिरात जावे लागले : माधव मानकर

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** प्रभू श्रीरामचंद्र यांच्या मंदिराला विरोध करणाऱ्यांनाच आज रामाच्या चरणी नतमस्तक व्हावे लागत आहे. हा भारतीय जनता पक्षाचा नाही तर कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेचा आणि त्यागाचा विजय आहे, असे प्रतिपादन भाजपा जिल्हा सरचिटणीस माधव मानकर यांनी केले.

राम मंदिरात काँग्रेसच्या नेत्यांनी दर्शन घेतल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना मानकर म्हणाले, "ज्यांनी राम जन्मभूमी आंदोलनाला विरोध केला, कोर्टात वकील उभे केले, रामसेतूला काल्पनिक म्हटले आणि कारसेवकांवर गोळ्या झाडणाऱ्यांसोबत राहिले, तेच आज राम नामाचा जप करत आहेत. यापेक्षा मोठा राम महिमा काय असू शकतो?" "काँग्रेसने कधीही सनातन धर्माला आणि राम मंदिराला पाठिंबा दिला नाही. एक रुपयाचीही देणगी न देणाऱ्यांना आज राम मंदिरात जावे लागत आहे. यावरून सिद्ध होते की या देशाला रामाशिवाय पर्याय नाही. राम नामाशिवाय तारण नाही," असेही ते म्हणाले.

मानकर पुढे म्हणाले, "निवडणुकीसाठी केवळ 10 मिनिटे मंदिरात येऊन फोटो काढणे आणि नंतर रामनामाच्या टोप्या फेकणे हा सनातन धर्माचा अपमान आहे. खरा भक्त तोच जो मनापासून रामभक्ती करतो. संत गजानन महाराजांच्या आशीर्वादाने पवित्र झालेल्या या मंदिरात खरे भक्तच दर्शनासाठी येतात."

"छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आणि सनातन धर्म हीच या देशाची ओळख आहे. ती कधीही मिटणार नाही. रामभक्ती ही कायम आहे आणि राहणार आहे," असा विश्वास माधव मानकर यांनी व्यक्त केला.

## अकोला कच्छी मेमन जमाततर्फे 18 जुलै रोजी छातीचा एक्स-रे मोफत शिबिर

**अकोला :** समाजसेवा आणि जनआरोग्याच्या उद्देशाने अकोला कच्छी मेमन जमात यांच्या वतीने शशक्ती प्रोजेक्ट अंतर्गत शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी मोफत छातीचा एक्स-रे मोफत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत केएमटी हॉल, अकोला येथे होणार आहे. या शिबिरात ज्या नागरिकांना दीर्घकाळापासून खोकला, छातीत दुखणे, सतत ताप येणे, अचानक वजन कमी होणे, भूक न लागणे, रात्री घाम येणे किंवा कफामध्ये रक्त येणे यांसारख्या तक्रारी आहेत, अशा नागरिकांची मोफत छातीची एक्स-रे तपासणी करण्यात येणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. वेळेत तपासणी केल्यास फुफ्फुसांशी संबंधित गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन योग्य उपचार सुरू करण्यास मदत होऊ शकते. शिबिरात सहभागी होण्यासाठी शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत केएमटी हॉल, अकोला येथे नावनोंदणी (नोंदणी) करण्यात येणार आहे. अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी नागरिकांना या मोफत आरोग्य सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, गंभीर आजारांपासून बचाव करता येतो. समाजातील गरजू व्यक्तीपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविणे हेच जमातीचे उद्दीष्ट आहे.

## कत्तलीसाठी नेणाऱ्या बैलाची पोलिसांनी केली सुटका



प्रतिनिधी १५ जुलै

**मूर्तिजापूर :** 14 जुलै रोजी एएसआय सुरेश पांडे यांना माहिती मिळाली की एक इसम रामखेडा येथून दोन बैलांना कत्तली करीता कसाबपुरा येथे घेऊन जात आहे. पोलिसांनी कंजरा टी पॉइंट येथे नाकाबंदी केली असता एक इसम दोन बैलांच्या पायाला व तोंडाला आखूड दोरीने बांधून लाकडी काठीने यातना देत नेताना दिसला. शेख निसार शेख सत्तार राहणार महंमदिया प्लॉट मूर्तीजापुर असे सांगितले. त्याच्या विरुद्ध कारवाई केली.पोलिसांनी त्याची विचारपूस केली असता गोवंश कत्तली करिता घेऊन जात असल्याचे निष्पन्न झाले. प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांना निर्दयतेने वागविणे कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. सदर कारवाई मध्ये 40 हजार रुपये किमतीचे दोन बैल जप्त करून पुढील संगोपनाकरिता पुंडलिक बाबा गोरक्षण संस्था शिरसो मुर्तीजापुर येथे दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनात धर्मेंद्र जोशी, एएसआय सुरेश पांडे, सचिन दुबे,गजानन खेडकर, रोशन लकडे, पंढरीनाथ पोले यांनी केली.

# लाडकी बहीण योजनेतील 92 लाख महिलांना न्याय मिळावा

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे मुख्यमंत्री यांना निवेदन

प्रतिनिधी १५ जुलै




**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत ई-केवायसी व पात्रता पडताळणीनंतर सुमारे ९२ लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, अकोला महानगरच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले.

महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आलेल्या निवेदनात, ई-केवायसी, आधार लिंकिंग, बँक खात्यांतील तांत्रिक अडचणी किंवा कागदपत्रांतील किरकोळ त्रुटींमुळे पात्र महिलांना योजनेच्या लाभापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे नमूद करण्यात आले. महिलांनी शासनावर विश्वास ठेवून अर्ज केले, शासनाने त्यांची नोंदणी केली आणि आता त्याच महिलांना अपात्र ठरविण्यात येत असल्याने लाखो महिलांमध्ये संभ्रम, नाराजी आणि शासनाविषयी प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. निवेदनात ९२ लाख महिलांना अपात्र ठरविण्याच्या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची, ज्या महिलांची ई-केवायसी अपूर्ण आहे.

त्यांची तातडीने ई-केवायसी पूर्ण करण्याची, राज्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर, गाव व ग्रामपंचायत स्तरावर विशेष ई-केवायसी शिबिरे आयोजित करण्याची, ई-केवायसी पूर्ण झाल्यानंतर सर्व पात्र महिलांच्या खात्यात थकीत हप्ते त्वरित जमा करण्याची तसेच अपात्र ठरविण्यात आलेल्या महिलांना त्यामागील कारण लेखी स्वरूपात कळवून पुन्हा पात्र होण्याची संधी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी जावेद जकारिया (प्रदेश संघटक सचिव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार), माजी नगरसेवक इनुलहाक कुरेशी, समाजसेवक फिरोज खान, मो. शफीक तवर, जुनेद खान, सैयद आसिफ अली, मोसिन परवेज, राजू भाई, सोहेल खतीब तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्वच्छतेला प्राधान्य द्या

**अकोला :** सध्या पावसाळा असल्याने शहरी तसेच ग्रामीण भागात स्वच्छतेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. नालेसफाई तसेच परिसर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होणार नाही याबाबत सजगता आवश्यक आहे.

## निधन वार्ता

### मधुमालती तापडिया



**अकोला :** येथील श्रीमती मधुमालती शशिमोहन तापडिया (९२) यांचे १५ जुलै रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज दुपारी ४.३० वाजता मधुकृष्ण, रघुनायक अपार्टमेंट जवळ, माधव नगर, तुकाराम चौकातून निघणार आहे. अनिल, माजी नगराध्यक्ष अजय तापडिया यांच्या त्या मातोश्री होत.

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. 2276/2026 एम.जे.सी. क. १७८/२०२६

दिनांक 10/07/2026 चौकशी तारीख - १८/०८/२०२६

अर्जदार - १. श्रीमती नेहा रविंद्र भोरे, वय ५२ वर्ष धंदा घरकाम २. गौरी रविंद्र भोरे, वय २७ वर्षे धंदा खाजगी नोकरी दोघेही रा. नरसिंग मंदिराजवळ, नरसिंग कॉलनी आकोट ता. अकोट जि. अकोला

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायम रहीवासी असुन अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ वडील नामे रविंद्र पांडुरंग भोरे हे आपले संपूर्ण जिवनकाळात मौजे नरसिंग कॉलनी आकोट ता आकोट जि. अकोला येथेच राहलं व तेथेच दि. ०८/०९/२०१९ गेजी मयत झाले आहेत. तसेच मयत रविंद्र पांडुरंग भोरे यांची आई नामे कौसल्याबाई पांडुरंग भोरे हया दि. १३/०४/२००६ रोजी मौजे नरसिंग कॉलनी आकोट ता. आकोट जि.आकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत रविंद्र पांडुरंग भोरे यांना अर्जदार क १ व २ यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १०/०७/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १५ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# 67 शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर बियाणे कंपनीवर गुन्हा

## बाभूळगाव पोलिसांची कारवाई : सोयाबीन बियाणे उगवलाच नाही

प्रतिनिधी १५ जुलै

**यवतमाळ :** खरीप हंगामात शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे विकून दिशाभूल केल्याचा आरोप असलेल्या जालना जिल्ह्यातील 'बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि.' या कंपनीविरुद्ध बाभूळगाव पोलिसांनी विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. बियाणे उगवण न झाल्याच्या तब्बल ६७ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाने ही कारवाई केली.

पंचायत समिती बाभूळगावचे बियाणे निरीक्षक तथा कृषी अधिकारी दत्तात्रय विठ्ठलराव तमलवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ६ ते १३ जुलैदरम्यान शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या. तपासादरम्यान संबंधित कंपनीच्या बियाण्यांच्या पिशव्यांवर "BEST QUALITY GUARANTEED 100% SATISFACTION" असा दावा करण्यात आल्याचे आढळले. मात्र, बियाणे नियम १९६८ मधील नियम १० नुसार अशा प्रकारचा दावा दिशाभूल करणारा असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.

**नागपूर प्रयोगशाळेच्या अहवालात नमुना अप्रमाणित**

कृषी विभागाने बियाण्यांचे नमुने नागपूर येथील शासकीय बियाणे तपासणी प्रयोगशाळेत पाठविले. प्रयोगशाळेच्या अहवालात एका नमुन्याला अप्रमाणित ठरविण्यात आले. तसेच संबंधित वाण सत्यतादर्शक स्वरूपातील असल्याने उत्पादन, पॅकिंग आणि सीलिंग प्रक्रियेत कोणत्याही शासकीय प्रमाणीकरण संस्थेचा सहभाग नसतो. अशा परिस्थितीत गुणवत्तेची संपूर्ण जबाबदारी उत्पादक कंपनीची असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी कंपनीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३, बीज अधिनियम १९६६ मधील कलम ६(अ), ७(ब), १९ व २१ तसेच बियाणे नियम १९६८ मधील नियम १० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाभूळगाव पोलिस ठाण्यात १४ जुलै रोजी रात्री गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस निरीक्षक रोहित गंगाधर बेम्ब्रे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, जिल्हाधिकारी विकास मीना यांनी शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा देत खरीप हंगामात जिल्हाभर खते व बियाण्यांच्या विक्रीवर विशेष भरारी पथके कार्यरत असल्याचे सांगितले. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## एसआयआर वेळेत पूर्ण, बीएलओंचा सत्कार

प्रतिनिधी १५ जुलै

**राळेगाव :** एसआयआरचे काम वेळेच्या आत पूर्ण करणाऱ्या राळेगाव उपविभागातील तीन बीएलओंचा गौरव करण्यात आला.

एसआयआरसाठी ३० जून ते २९ जुलै असा पहिल्या टप्प्यातील कालावधी ठरवून देण्यात आला आहे. मात्र तीन बीएलओंनी केवळ १३ दिवसांत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करून आदर्श निर्माण केला. यात घरोघरी भेटी, मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी, माहिती संकलन, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे आणि एसआयआरच्या विशिष्ट रकान्यात अचूक नोंदी भरणे या सर्व कामांचा समावेश होता. प्रीती वासेकर-खडकी (सुकळी), धनराज कचरे-उंदरी आणि दीपक मलमे-तेजनी या बीएलओंनी वेळेच्या आत अचूक काम करून दाखविले. त्यामुळे त्यांच्यासह संबंधित गावातील नागरिकांचाही गौरव करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार अमित भोईटे, मुख्याधिकारी गिरीश पारेकर, गटशिक्षणाधिकारी नवनाथ लहाने, दिलीप चिडे, संजय झाडे, सागर धनाळकोटवार, विलास चांदोरे, नरेंद्र आत्राम आदी उपस्थित होते. इतर बीएलओनींही वेळेत आणि त्रुटीरहित काम पूर्ण करावे, असे आवाहन सुधीर पाटील यांनी केले.

## धावत्या एसटीला भीषण आग

### चालकाच्या प्रसंगावधानाने वाचले ४३ प्रवाशांचे प्राण





प्रतिनिधी १५ जुलै

**यवतमाळ :** पुसदहून अकोल्याकडे निघालेल्या वाशिम आगाराच्या एसटी बसला मंगळवारी सायंकाळी खंडाळा घाटातील येलदरी घाट परिसरात अचानक भीषण आग लागल्याने एकच खळबळ उडाली. बसमध्ये सुमारे ४३ प्रवासी प्रवास करत होते. चालकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवाशांना वेळेत खाली उतरविण्यात आल्याने मोठी जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी सुमारे ७.१५ वाजताच्या सुमारास बसच्या समोरील केबिनमधून धूर निघू लागला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चालकाने तत्काळ बस थांबवून प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे सर्व प्रवासी सुखरूप बचावले.

घटनेची माहिती मिळताच पुसद नगर परिषदेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले होते. प्राथमिक अंदाजानुसार दीड ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेनंतर पुसद आगार तसेच यवतमाळ येथील एसटी विभागीय कार्यालयातील अधिकारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पंचनामा करून आगीच्या कारणांचा तपास सुरू केला आहे. प्राथमिक माहितीनुसार आग बसच्या समोरील केबिनमधून लागल्याचे सांगितले जात असले, तरी नेमके कारण तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

## अयोध्या श्रीराम मंदिर चोरीप्रकरणी काँग्रेसचे आंदोलन

प्रतिनिधी १५ जुलै



**पुसद :** अयोध्या येथील श्रीराम मंदिर परिसरात घडलेल्या चोरीच्या घटनेचा निषेध करत पुसद शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी आझाद चौकातील श्री बालाजी मंदिरासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यानंतर संबंधित प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

यवतमाळ जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ. मोहम्मद नदीम यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान श्रीराम मंदिर परिसरातील चोरीच्या घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

निवेदनात श्रीराम मंदिरासह देशातील सर्व प्रमुख धार्मिक स्थळांची सुरक्षा अधिक मजबूत करावी, चोरीच्या घटनेचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी सुरक्षा यंत्रणा उभारावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष झिया शेख, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष ज्ञानदीप कांबळे, अल्पसंख्याक काँग्रेसचे महासचिव सय्यद इस्तियाक, युवक काँग्रेसचे महासचिव सुजित मानकामे, तहेसीन खान, महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नगरसेविका योगिता नेमायते, सय्यद जानी, युवक विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोडे, चेतन कांबळे, सुमेध कुलदिपके, शांडी कांबळे, अंकु बिरगड, बौधी इंगोले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## विद्युत तारा, मोटारी चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; तीन आरोपी ताब्यात

### १० गुन्हे उघड, १४.७३ लाखांचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

प्रतिनिधी १५ जुलै



**यवतमाळ :** वणी आणि पांढरकवडा उपविभागात विद्युत खांबांवरील ॲल्युमिनियम तारा तसेच शेतकऱ्यांच्या विहिरीवरील पाण्याच्या मोटारी व केबल चोरी करून दहशत निर्माण करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दहा चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून, तब्बल १४ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वणी येथील रंगनाथ नगर परिसरातून शेख समीर शेख अमीर (वय २६), सय्यद अली सय्यद गुलाब (वय ३५) आणि एका विधी संघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपींनी पांढरकवडा, राळेगाव, पाटण, मारेगाव, मुकुटबन व पारवा परिसरातील शेतशिवारातून विद्युत खांबांवरील ॲल्युमिनियम तारा, मोटार पंप आणि केबल्स चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपींनी चोरीचा ॲल्युमिनियम तार वणी येथील भंगार व्यावसायिक निसारउद्दीन खान याला विकल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी घोन्सा टी-पॉईंट परिसरात सापळा रचून त्यालाही ताब्यात घेतले. त्याच्या मालवाहू वाहनातून मोठ्या प्रमाणात चोरीचा ॲल्युमिनियम तार जप्त करण्यात आला. तसेच मुख्य आरोपीच्या घराजवळून जाळून काढलेला तांब्याचा तार आणि चोरीची सबमर्सिबल मोटारही हस्तगत करण्यात आली.

या कारवाईत सुमारे १,९१० किलो ॲल्युमिनियम तार, १४ किलो तांब्याचा तार, एक सबमर्सिबल मोटार, चोरीसाठी वापरलेली दोन मालवाहू वाहने आणि तार कापण्यासाठी वापरलेले नऊ कटर असा एकूण १४.७३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ता पेंडकर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## मुळाव्यात अन्न व औषध प्रशासनाची धडक

### दोन किराणा दुकानांची तपासणी

प्रतिनिधी १५ जुलै

**उमरखेड :** तालुक्यातील बाजारपेठेचे गाव असलेल्या मुळावा येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने गोपनीय तक्रारीच्या आधारे दोन किराणा दुकानांची तपासणी केली. मात्र, कागदपत्रांची पडताळणी आणि प्राथमिक चौकशीनंतर कोणतीही अनियमितता आढळून न आल्याने पथकाला कोणतीही कारवाई न करता परतावे लागल्याची माहिती आहे.

यवतमाळ अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी जगदीश काकडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १० जुलै रोजी सायंकाळी पोलीस बंदोबस्तात मुळावा येथे धडक दिली. पथकाने दोन किराणा दुकानांतील परवाने व इतर आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली. यावेळी संबंधित दुकानदारांची प्राथमिक चौकशीही करण्यात आली. तपासणीत आक्षेपार्ह बाब आढळून न आल्याने कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे समजते.

> अन्न व औषध प्रशासनाचे पथक गावात दाखल झाल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरताच परिसरातील अनेक दुकाने काही काळासाठी बंद झाल्याची चर्चा होती. मात्र, याबाबत अधिकृत पुष्टी झालेली नाही. या तपासणीमुळे मुळावा परिसरात दिवसभर विविध चर्चांना उधाण आले होते.

## 'शिक्षण हीच मानवी जीवनाचा खरा उद्धार करणारी गुरुकिल्ली' – गटशिक्षणाधिकारी धिरज आडे

### कवडीपूर जि.प. शाळेत नववीचा शुभारंभ; पहिली माध्यमिक दर्जाची जि.प. शाळा

प्रतिनिधी १५ जुलै



**पुसद :** पुसद पंचायत समितीअंतर्गत भोजला केंद्रातील कवडीपूर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेला नव्याने इयत्ता नववीचा वर्ग जोडण्यात आला. पुसद तालुक्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये माध्यमिक स्तरावरील नववीचा वर्ग सुरू करणारी कवडीपूर ही पहिली शाळा ठरल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना गटशिक्षणाधिकारी धिरज आडे म्हणाले, "शिक्षण हे वाघिणीचे दूध असून ते आत्मसात करणारा व्यक्ती आत्मविश्वासाने पुढे जातो. शिक्षण हीच मानवी जीवनाचा खरा उद्धार करणारी गुरुकिल्ली आहे. ते केवळ पदवी मिळविण्याचे साधन नसून सुजाण, स्वाभिमानी आणि संवेदनशील नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे." कार्यक्रमास सरपंच मयुर राठोड, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी उमेश वाघमारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभय पवार, मुख्याध्यापक श्रीकांत चव्हाण, ग्रामविकास अधिकारी चांडे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश पवार यांच्यासह ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नवागत विद्यार्थ्यांच्या डफडीच्या तालावरील स्वागत मिरवणुकीने झाली. विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्या पायांचे ठसे घेण्यात आले. त्यानंतर क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. धिरज आडे यांनी शाळेतील शिक्षक, ग्रामपंचायत, पालक आणि ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे कवडीपूर शाळेचा कायापालट झाल्याचे सांगितले. भविष्यात शाळेत उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व मुख्याध्यापकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सरपंच मयुर राठोड यांनी शाळेच्या दर्जावाढीचे श्रेय नामदार इंद्रनील नाईक, नगराध्यक्ष ॲड. मोहिनी नाईक, गटशिक्षणाधिकारी धिरज आडे, मुख्याध्यापक श्रीकांत चव्हाण आणि शाळा व्यवस्थापन समितीला देत ग्रामपंचायतीकडून विकासासाठी पूर्ण सहकार्याची ग्वाही दिली. प्रवेशोत्सवानिमित्त शाळेत उभारलेला आकर्षक सेल्फी पॉइंट विद्यार्थ्यांसह पालक आणि मान्यवरांचे विशेष आकर्षण ठरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्रीकांत चव्हाण यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शशिकांत जामगडे यांनी केले.

## एसटीचा वर्धापन दिन; वृक्षारोपण व वाचनालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी १५ जुलै



**उमरखेड :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे बसस्थानकात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वृक्षारोपण तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या वाचनालयाचे उद्घाटन आमदार किसनराव वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक-युवती आणि वाचनप्रेमींना दर्जेदार साहित्य उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेल्या वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, नगराध्यक्षा तेजश्री जैन, मुख्याधिकारी अजय कुरवाडे, बळवंतराव नाईक, शैलेष मुंगे, विजू हडपकर, पंकज कदम, आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके, शीतल धोंगडे, सविता पाचकोरे, उषा तास्के, सपना चौधरी, अनिल नरवाडे, अजय पाईकराव, राहुल मोहीतवार, कैलास कदम, संजय जाधव, वसंतराव देशमुख, दामोदर इंगोले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, एसटी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, चालक-वाहक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेतीमाफियांची दहशत; पत्रकारांना जीवे मारण्याच्या धमक्या

प्रतिनिधी १५ जुलै



**पुसद :** अवैध रेती तस्करीविरोधात सातत्याने वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांनाच आता जीवे मारण्याच्या धमक्या मिळू लागल्याने पुसदमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पत्रकारांनी एकत्र येत उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन सादर करून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई तसेच पत्रकारांना संरक्षण देण्याची मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की, अवैध रेती उत्खनन व वाहतुकीमुळे शासनाच्या गौण खनिजाची मोठ्या प्रमाणावर चोरी होत असून रेतीमाफियांची दहशत वाढत आहे. कारवाई करणाऱ्या महसूल व पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ले, दमदाटी आणि जीवे मारण्याचे प्रयत्न होत असल्याने प्रशासनावरही दबाव निर्माण होत आहे.

पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळेच अनेकदा अवैध रेती तस्करीविरोधात कारवाई होते. मात्र, त्यानंतर संबंधितांकडून पत्रकारांना लक्ष्य केले जात असून थेट जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

याच पार्श्वभूमीवर वंदे भारत न्यूज चॅनलचे प्रतिनिधी शेख महेबूब शेख इब्राहिम यांना मोबाईलवरून धमकी देण्यात आल्याचा प्रकार समोर आला. अवैध रेती तस्करीबाबतच्या वृत्तांकनाचा उल्लेख करत अज्ञात व्यक्तीने शिवीगाळ करून "बंदुकीची गोळी घालून ठार मारण्याची" धमकी दिल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या प्रकरणी वसंत नगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा (एनसीआर) नोंदविला आहे. मात्र, एवढ्या गंभीर धमकीनंतरही केवळ अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाल्याने पत्रकारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून त्यामुळे रेतीमाफियांचे मनोबल वाढत असल्याची खंत पत्रकारांनी व्यक्त केली.

पत्रकारांवरील धमक्या या केवळ प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावरचा हल्ला नसून कायदा-सुव्यवस्थेलाही आव्हान असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरोपीचा तातडीने शोध घेऊन त्याच्याविरुद्ध कठोर फौजदारी कारवाई करावी तसेच संबंधित पत्रकाराला आवश्यक संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

हे निवेदन ॲड. अनिल ठाकूर, अहमद पठाण, ज्ञानेश्वर मेटकर, मारोती भस्मे, उमेश जाजू, संजय रेक्कावार, नवाज अली, मनीष दशरथकर, दीपक धर्माधिकारी, सय्यद अकिब रिझवी, ॲड. प्रदीप नरवाडे, अब्दुल हमीद, विष्णू धुळे, कैलास श्रावणे, किशोर कांबळे, अनिल चेंडकाळे, दिनकर गुल्हाने, बाबूलाल राठोड, सुनील सिंह काकण, बाबा खान, विजय निखाते, सुनील गंगाखेडे, प्रकाश खिल्लारे, मोहम्मद हनीफ, शब्बीर शेख, राजू सोनूने, बाबाराव उबाळे, मुब्बशीर शेख, शंकर माहुरे, राजेश ढोले आदी पत्रकारांनी संयुक्तपणे सादर केले.

## दिग्रस आगारात वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा घेतला संकल्प

प्रतिनिधी १५ जुलै



**दिग्रस :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त दिग्रस एसटी आगारात मंगळवारी वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हरित महाराष्ट्राच्या संकल्पाला बळकटी देण्यासाठी आगार परिसरात विविध देशी व स्थानिक हवामानास अनुरूप वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमात वृक्षारोपणासोबतच लावलेल्या रोपांचे नियमित संगोपन करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे मान्यवरांनी सांगितले. यावेळी आगार व्यवस्थापक प्रकाश भदाडे, बाबूसिंग पवार, वरिष्ठ लिपिक के. एल. राठोड, आगार लेखापाल सूचिता राऊत, लिपिक अंजु मनवर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजकुमार वानखडे, सुधीर देशमुख, नगरपालिकेचे उपाध्यक्ष सचिन बनगिनवार, शिवसेना गटनेते बाळू जाधव, नगरसेवक संदीप झाडे, नगरसेवक किशोर कोहचडे, शिवसेना उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी, अमोल राठोड, विनायक दुधे, निलेश मुंडे तसेच एसटीचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारा ठरला असून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. १५ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# खा. वानखडे यांनी बांधावर जाऊन बोगस बियाण्यांची केली पाहणी !

## अधिकाऱ्यांना बोगस बियाणे विक्रेता कंपन्यांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश!

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** रावळगाव ता. अचलपूर येथील अनेक शेतकऱ्यांच्या बियाणे उगवले नाही अशा अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या मुळे त्याची दखल घेत आज खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर तालुका कृषी अधिकाऱ्यांना सोबत घेऊन परिसरातील शेतात पाहाणी केली. या प्रसंगी बोगस बियाणांमुळे पिक उगवलेच नसल्याचे निदर्शनास आले , जे काही उगवले ते निकृष्ट दर्जाच्या आहेत असे शेतकऱ्यांनी



खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या निदर्शनास आणून दिलेत. शेतातील काही बियाणे १० टक्के २०टक्के तर काही पूर्णच बियाणे निघाले नसल्याचे आढळून आले. सदर बियाणे बूस्टर , ओसवाल व इतर काही कंपन्यांचे असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले. बोगस बियाणांमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले. यावेळी खा. बळवंत वानखडे यांनी जिल्हा कृषी अधिकारी यांच्या सोबत संपर्क साधून बोगस बियाणे विक्रेता कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना दिल्यात. यावेळी प्रामुख्याने तालुका कृषी अधिकारी - अक्षय क्षीरसागर , श्रीधर काळे ( माजी पंचायत समिती उपसभापती अचलपूर ), चेतन जवंजाळ , सुनील पवार , स्वप्निल राऊत , सुभाष खांडेकर , गोलू अतकरे , राजेंद्र राऊत , प्रकाश राऊत , हर्षल जवंजाळ , प्रशांत भडांगे. जुबेर भाई यांच्या सह स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

# नाकाबंदी दरम्यान ग्रामीण पोलिसांनी पकडला गुटखा

प्रतिनिधी १५ जुलै



**अमरावती :** जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अवैदय धंदयावर कारवाई करणे बाबत नाकाबंदी लावुन धडक करवाई करण्याचे आदेशीत केले आहे.

त्या अनुषंगाने दि. १३ जुले रोजी रात्री ११ वा पासुन पोलीस स्टेशन धारणी येथील पथकाने फॉरेस्टनाका येथे नाकाबंदी मोहीम राबवीली दरम्यान हजर असलेले अधिकारी व अंमलदार वाहणांना घांबवून वाहणे चेक करीत असतांना दरम्यान एक पांढ-या रंगाची चार चाकी वाहन थांबवून सदर वाहन चालक व बाजुला बसलेला इसम यांची विचारपुस केली असता वाहन चालक याने आपले नाव महेद्र हरकचंद पाटीदार वय ३८ वर्ष रा ग्राम गांदवा ता जि खंडवा व बाजुला बसलेल्या इसमाने आपले नाव कातीक विपीन पटेल वय २४ वर्ष रा ग्राम हंतोडा ता अंजनगाव (सुजी) जि अमरावती असे सांगितले वरुण सदर वाहनाची तपासणी केली असता सदर चार चाकी वाहन क्र एम पी १२ सी ए ५३६९ वाहनाच्या मागील बाजुस डिक्कीमध्ये एकुण एकुण ३९०००/- रुपये प्रतिबंधीत गुटखा मिळुन आला.

सदर गुटखा तसेच, रेनॉल्ट कंपनीची क्वीड पांढ-या रंगाची चार चाकी गाडी किंमत अं २,१०,०००/-रुपये एक ओपो कंपनीचा मोबाईल ज्याचा मॉडल क्र सीपीएच २४६१ कि. अं १०,०००/- रु व एक वन प्लस कंपनीया मोबाईल ज्याचा मॉडेल क्र आयव्ही २२०१ किअं १४,०००/- असा एकूण २,७३,०००/- रु चा मुददेमाल. जप्त करण्यात येवून वाहन चालक महेद्र हरकचंद पाटीदार वय ३८ वर्ष रा ग्राम गांदवा ता जि खंडवा व त्याचे सहकारी कार्तीक विपीन पटेल वय २४ वर्ष रा ग्राम हंतोडा ता अंजनगाव (सुजी) जि अमरावती यांच्या विरुध्द प्रचलित कायदयाप्रमाणे कलम १२३,२२३,२७१,२७२,२७ ४,२७५ भा न्या से अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि नारायण धांडे हे करत आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधिक्षक सा. अमरावती दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, माधवराव गरुड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हान, सपोनि संध्या चव्हान, पोउपनि नारायण धांडे, पोहेका सतीश राठोड,, पोहेकों भिमसिग उइके, पोहेको रुपेश तायडे बन पोकों जगत तेलगोटे, पोकों शरद आडे बन ६५९, पोकों आदित्य सुरनर मपोकों कवीता सोनोने, सैनिक शाम कस्तुरे, सैनिक अनिल जांभेकर , सैनिक धर्मराज पाटील, सैनिक उमेश जावरकर स क्र ७९०९, सैनिक विरेंद्र शेलेकर यांनी केली आहे.

# इर्विन चौक स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक जागा हस्तांतर प्रकरणात उच्च न्यायालयाचा निर्णय स्वागताहार्य -आ. सुलभाताई खोडके

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जागेसंदर्भातील प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १४ वर्षानंतर सोमवार दिनांक १३ जुलै २०२६ रोजी आंबेडकरी अनुयायांच्या बाजूने निर्णय दिला. या निर्णयामुळे आता स्मारकासाठी जागा अधिग्रहित करण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

बाबासाहेबांचे अनुयायी व विविध सामाजिक संघटनांनीही या जागेसाठी सातत्याने कायदेशीर लढा दिला. त्यामुळे एवढ्या वर्षांनंतर न्यायालयीन लढाई जिंकल्याने उच्च न्यायालयाचा हा निर्णय महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सन्मान करणारा असून आंबेडकरी समाजाच्या भावना आणि अविरत संघर्ष व लढ्याचा विजय आहे. अशी भावना आमदार सुलभाताई



संजय खोडके यांनी व्यक्त केली. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक जागा हस्तांतरण प्रकरणाचा निकाल आंबेडकरी जनतेच्या बाजूने लागताच आनंदोत्सव व जल्लोष व्यक्त होत आहे. पार्श्वभूमीवर आंबेडकरी अनुयायी व स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांची भेट घेऊन अभिनंदन केले. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबडेकर स्मारक जागा हस्तांतर प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आंबेडकरी अनुयायांच्या बाजूने निकाल दिल्याने या निर्णयाचे आ.सौ.सुलभाताई खोडके व आ. संजय खोडके यांनी स्वागत केले आहे. उल्लेखनीय आहे की, अमरावती शहराच्या विविध सामाजिक चळवळीचे केंद्रस्थान व तमाम आंबेडकरी जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या इर्विन चौक स्थित महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील स्मारकाच्या जागा हस्तानंतरण संदर्भात अमरावती च्या आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी तीन वर्षापूर्वी म्हणजेच दिनांक २६ जुलै २०२३ रोजी राज्याच्या पावसाळी अधिवेशनात सरकारचे लक्ष वेधले. या प्रकरणात सरकारने स्पेशल कौन्सिलची ( नामांकित शासकीय अधिवक्ता ) यांची नेमणूक करून हा निकाल आपल्या बाजूने लावून घ्यावा, अशी मागणी केली होती.

# विद्यापीठातील बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी पूर्ण केली प्रगत संशोधन इटर्नशिप

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी (जैवतंत्रज्ञान) विभागातील एम.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, आगरकर रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे, सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नॉस्टिक अॅन्ड रिसर्च, सेंट्रल इन्स्ट्रुमेंटेशन सेल, श्री मौर्य ?ग्रो इंडस्ट्री, अमरावती अशा देशातील विविध नामांकित राष्ट्रीय संस्था आणि



उद्योगांमध्ये आपली विशेष संशोधन इंटर्नशिप यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांना मॉलिक्युलर डायग्नॉस्टिक्स (आण्विक निदान), नॅनोटेक्नॉलॉजी आणि प्लांट बायोटेक्नॉलॉजी यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष प्रयोगशाळेत काम करण्याचा आणि प्रशिक्षण घेण्याचा मोठा अनुभव घेता आला.

प्रगत प्रयोगशाळा तंत्रज्ञान आणि औद्योगिक कार्यपध्दतींच्या या सखोल अनुभवामुळे विद्यार्थ्यांना जागतिक वैज्ञानिक मानकांनुसार आवश्यक असलेली महत्त्वाची कौशल्ये आत्मसात करता आलीत. हा अनुभव विद्यार्थ्यांच्या भविष्यातील संशोधन आणि व्यावसायिक करिअरला आकार देण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. या यशाबद्दल बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा-यांचे विद्यार्थ्यांनी आभार मानलेत. विभागाच्या मार्गदर्शनामुळेच एवढया उच्च दर्जाच्या शैक्षणिक आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध होऊ शकल्याचे विद्यार्थ्यांनी आवर्जून नमूद केले.

# इलेक्ट्रीक तार व शेतातील तांब्याचे तार चोरी करणारे दोन सराईत गुन्हेगार जेरबंद

## मोर्शी, वरुड, आसेगांव पुर्णा, कळमेश्वर येथील गुन्हे उघड

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** सराईत गुन्हेगार, स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांचे कडुन जेरबंद केले त्यांच्याकडून पोलिसांनी -मोर्शी, वरुड, आसेगांव पुर्णा, कळमेश्वर येथील गुन्हे उघड केले आहे.

आरोपी महेंद्र पिताबर कपुर वय ३४ वर्ष रा. शहापुर ह. मु. कोलपुरा, गिटटीखदान नागपुर जि. नागपुर, अनिल झलकु ऊईके वय ३५ वर्ष रा. रेल्वे गेट रोशनखेडा ता. वरुड जि. अमरावती असे आहे. पो.स्टे. वरुड येथे दिनांक २७/१०/२०२५ रोजी तक्रारदार नयन अरुणराव वानखडे वय ३५ वर्ष धंदा ठेकेदार प्रोपा समक्ष इलेक्ट्रीक मुलताई रोड वरुड रा. काठीवाले कॉम्प्लेक्स मागे वरुड जि. अमरावती यांनी तक्रार दिली कि, त्यांचे समक्ष नावाचे



इलेक्ट्रीक दुकान व गोडावुन हे मुलताई रोड शर्एँ ऑफीस समोर वरुड येथील असुन त्यांचे दुकानासमोर ठेवलेले ३ किमी वायर ७ बंडल, व केबल १ बंडल असा एकुण ३ लाख रुपयाचा तसेच त्यांचे सहकारी मित्र ठेकेदार विनोद गोकुलदास बेलवंशी वय ३४ वर्ष रा. शासकीय विश्रामगृह मागे वरुड यांचे बेलवंशी इलेक्ट्रीक नावाचे गोडावुन समोरुन इलेक्ट्रीक बंडल २.५ किमी अंतराचे वायर अडीच बंडल असा ०२ लाख रुपयाचा मुद्येमाल कोणीतरी चोरुन नेला.

अशा तक्रारदार यांचे तक्रारी वरुन पो.स्टे. वरुड येथे अप. क्रमांक ६७९/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस. चा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधिक्षक निकेतन कदम, यांनी सदर गुन्हा उघड करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा अमरावती (ग्रामीण) यांना सुचना निर्गमीत केल्या होत्या.

# अमरावती जिल्ह्यात २५००० वृक्षांची लागवड

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** दि.२२ जुलै ते दि.२९ जुलै पर्यंत चालणार वृक्ष लागवडीचा उपक्रम - या उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे, गावांची हद्द, नदी-नाले परिसर तसेच मोकळ्या जागांवर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण – या उपक्रमामध्ये अमरावती जिल्ह्यातील सर्व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी सहभाग घेण्याचे केले नवनित राणा यांनी आवाहन

कोणत्या प्रकारच्या वृक्षाची लागवड करावी याकरिता नवनित राणा यांनी वडाळी येथील रोपवाटिका मध्ये जावून केली वृक्षाची पाहणी

महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वांत जास्त कालावधीत मुख्यमंत्री राहिल्याबद्दल भाजपा नेत्या मजी .खा.नवनित राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना दिल्या



शुभेच्छा वृक्ष हेच भविष्यातील जीवनाचे आधार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती करणार असल्याचे नवनीत राणा यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दि. २२ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण अमरावती जिल्ह्यात २५ हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प भाजपा नेत्या तथा माजी खासदार मा. नवनित राणा यांनी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत केला आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम दि. २२ जुलै ते दि. २९ जुलै या कालावधीत जिल्हाभर राबविण्यात येणार आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मा. नवनित राणा यांनी अमरावती येथील वडाळी रोपवाटिकेला भेट देऊन विविध प्रकारच्या वृक्षांची पाहणी केली. पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त, दीर्घायुषी व स्थानिक हवामानास पोषक अशा वृक्षांची निवड करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. लागवडीनंतर वृक्षांचे संगोपन आणि संवर्धन यालाही तितकेच महत्त्व देण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# दहशत निर्माण करणाऱ्या इसमास धारदार शस्त्रासह ताब्यात





प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** दहशत निर्माण करणा-या इसमास धारदार शस्त्रासह ताब्यात घेण्यात आले असून - अवैध्यरित्या रनिंग गावठी भटटीवर धडक कर्यावाही गुन्हे शाखेने केली आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेतील पथकाची विशेष बैठक घेवुन शहरात अवैध्यरित्या घातक शस्त्र बाळगणा-या इसमावर तसेच अवैध्यरित्या गावठी भटटीची दारू निर्मीती करण्या-यावर प्रभावी मोहिम राबवीण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार अतुल वर, पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात पथकाने खालील प्रमाणे कारवाई केली. आरोपी रोहीत इंगळे रा. राहुल नगर हा पोलीस स्टेशन फेजरपुरा हददी मधील चपराशीपुराप येथील सागर वाईन शॉप समोर दखलपात्र गुन्हा करण्याच्या उददेशाने स्वःता जवळ चाकु सारखे घातक शस्त्र घेवुन दहशत निर्माण करीत आहे.

# समाजसेवक विजयराव हावरे यांचा वाढदिवस अंध विद्यालयात साजरा



**दर्यापूर :** दर्यापूर येथील ज्येष्ठ समाजसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल (ग्रामीण) अमरावती जिल्हाध्यक्ष विजयराव हावरे यांचा वाढदिवस दिनांक १४ जुलै रोजी सामाजिक बांधिलकी जपत दर्यापूर येथील अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्यात आला.

यावेळी अंध विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांना बेटशीटचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थितांनी विजयराव हावरे यांचे कौतुक केले. या प्रसंगी विजयराव हावरे,सौ ज्योती हावरे,केशवराव हरणे, अशोक कोकाटे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गिरनाळे,विद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच हावरे यांचे सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

# ऑपरेशन ऑल-आऊट दरम्यान अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

## गुटख्यासह लाखांचा माल जप्त; ५५ पकड वॉरंट

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** ऑपरेशन ऑल-आऊट दरम्यान अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई केली. गुटखासह लाखांचा माल जप्त व ५५ पकड वॉरंट करण्यात आले.

दि.१४ जुले रोजी अमावस्या निमित्त गुन्हेगार लोक सक्रिय होवुन रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेवून मोठ्या प्रमाणात दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी सारखे गुन्हे करतात त्या अनुषंगाने निकेतन कदम (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रा. यांनी दखल घेवून अमरावती ग्रामीण घटकात दि.१३/०७/२०२६ चे २३/०० वा.ते १४/०७/२०२६ चे ०५/०० वा. दरम्यान ऑपरेशन ऑल आऊट मोहिम राबविण्यात आली.

मोहीमे दरम्यान पो.स्टे. धारणी हद्दीत नाकाबंदी करित असतांना धारणी पोलीसांनी शासनाने



प्रतिबंधीत केलेला गुटखा चारचाकी वाहनातुन वाहतुक करित असतांना २ आरोपीतांना अटक करण्यात आली असुन त्यांचे ताब्यातुन गुटखा, वाहन असा एकुण ०२,७३,०००/- रूचा माल जप्त करण्यात आला आहे.

सदर मोहिमेत ५२ अधिकारी व २४४ अंमलदार असे एकूण २९६ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. मोहिमेदरम्यान जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नाकाबंदी करुन संशयीत व्यक्ती, वाहने तसेच सार्वजनिक ठिकाणांची कसून तपासणी करण्यात आली. या विशेष मोहिमेदरम्यान एकूण १०७१ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १८९ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली असून ४२,१००/- रु.चा दंड वसूल करण्यात आला. तसेच शस्त्र अधिनियम अंतर्गत २ कारवाई करण्यात आल्या. , महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये १४ कारवाई करण्यात आल्या. दारुबंदी कायद्यान्वये १९ कारवाई करण्यात आल्या, पकड वॉरंटमधील ५५ वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली. वॉरंटमधील ०६ वॉरंटची अंमलबजावणी करण्यात आली.

**पोलीस अधीक्षक - 'गुन्हेगारांवर कठोर कारवाई होणार'**

ऑपरेशन कवच अंतर्गत अमरावती जिल्हा ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबविण्यात येत असून अंमली पदार्थ बाळगण्यावर कारवाई सुध्दा करण्यात येत आहे तसेच शाळा, महाविद्यालय, रुग्णालय यांच्या जवळील १०० मिटर परिसरातील पान टपरीवर विक्री करण्यात येणा-या तंबाखूजन्य पदार्थावर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे. सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, आपल्या परिसरामध्ये अंमली पदार्थ विकल्या जात आहे किवा वाहतुक करण्यात येत आहे किंवा तरुण सेवन करतात अशी माहिती मिळाल्यास तात्काळ कळवावे. दुचाकीवरुन प्रवास करातांना प्रमाणीत हेल्मेटचा वापर करावा. हेल्मेटची सुरक्षा हिच आपल्या आयुष्याची रक्षा वातावरण निर्माण करुन, कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी गुन्हेगारांवर करडी नजर ठेऊन अधिक प्रभावी मोहिम यापुढे राबविण्यात येणार आहे. पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी सांगितलं.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि.१५ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## लेह-लडाखमध्ये अपघात; वाशीमचे दोन तरुण वकील जागीच ठार



**वाशीम :** निसर्गरम्य लेह-लडाखच्या वाटांवर पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या वाशिम जिल्ह्यातील दोन तरुण वकिलांवर काळाने अत्यंत क्रूर घाला घातला. रविवारी, १२ जुलै रोजी दुपारच्या सुमारास झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात रिसोड येथील ॲड. कुणाल चोपडे (वय २४) आणि कारंजा लाड येथील ॲड. राघव देशपांडे (वय २५) या दोन जिवाभावाच्या मित्रांचा जागीच मृत्यू झाला.

वाशिम परिसरातील आठ मित्र ७ जुलै रोजी लडाख पर्यटनासाठी घराबाहेर पडले होते. मात्र, १२ जुलै रोजी बाईकने प्रवास करत असताना, समोरून आलेल्या लष्कराच्या वाहनाने त्यांच्या बाईकला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की कुणाल आणि राघव यांची प्राणज्योत जागीच मालवली. नुकतेच विधी शिक्षण पूर्ण करून त्यांना बार कौन्सिलकडून सनद मिळाली होती. हाताशी आलेली तरुण मुले डोळ्यांदेखत काळाच्या पडद्याआड गेल्याने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...

# शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण

## * जमीन तब्यात घ्या, चौकशी करून गुन्हे दाखल करा; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील आर. ए. कॉलेज यांनी शासनाच्या सिटनंबर २७/२३ या जागेवर यु.जी. एस.सि. योजनेअंतर्गत अनुदान घेवून अवैधरित्या मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम केले. व १०२८१ चौ.मि. जागा अनाधिकृतपणे हडप केली. या सर्वांच्या चुकीच्या कामाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व जागा व इमारत सरकारच्या ताब्यात घ्यावी. यासाठी वेळोवेळी आंदोलने, उपोषणे करूनही न्याय मिळाला नाही. तत्कालीन आ.स्व. विनायक मेटे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा स्मरण पत्र देवून चौकशी करण्याची मागणी पुन्हा स्मरण पत्राचे निवेदन देवून सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे. अन्यथा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.



निवेदनानुसार स्थानिक राजस्थान आर्य शिक्षण संस्था वाशीम यांचे अध्यक्ष / सचिव तथा संचालक मंडळाने शासनाची दिशाभुल करून खोटे दस्ताऐवज तयार केले. खोट्या दस्ताऐवजाच्या आधारे मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम करण्यासाठी यु.जी.एस.सी. मार्फत सन २०१० मध्ये १.५० कोटी रूपये अनुदान लाटले. व बांधकाम केले. सदर बांधकाम ज्या जागेवर केलेत ती जागा सिट क्रमांक २७/२३ १०२८१ चौ.मि. ही शासनाची असून त्यावर सुध्दा अतिक्रमण केलेले आहेत. असे असतांना ज्या उद्देशासाठी शासनाचे अनुदान घेतले आहे व जागा हडप केलेली आहे हे मुलीचे वस्तीगृह बांधकाम केले तेव्हापासून आजपर्यंत मुलीच्या वास्तव्यासाठी वापरात नसुन त्याचा गैरवापर आर्य शिक्षण संस्था करीत आहे. यापुर्वीही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २०१३ मध्ये तहसीलदारांना अतिक्रमणाबाबत सुचना देवून योग्यती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र संबंधित संस्थान चालकांनी आर्थिक देवाण घेवाण करून ही कारवाई थांबविली होती. त्यानंतर वारंवार निवेदन देवून आंदोलन केले. मात्र अद्यापही कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे पुन्हा १४ जुलै २०२६ रोजी स्मरण पत्राचे निवेदन देवून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाची प्रतिलिपी महसुल मंत्री चंद्रकांत बानकुळे यांना पाठविली आहे. त्यामुळे आजपर्यंत संस्थेवर कोणतीच कारवाई न झाल्याने संबंधितांची चौकशी करून कारवाई करा अन्यथा पुन्हा धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे पत्र

या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी महसुल विभागासह जिल्हा पोलिस अधिक्षकांना पत्र देवून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी असे पत्र दिले होते. १३ वर्षानंतरही या प्रकरणात कोणतीही कारवाई न झाल्याने पुन्हा चौकशी करण्याचे मागणी देवढे पाटील यांनी केली आहे. अन्यथा पुन्हा धरणे आंदोलन, उपोषण करण्याचा इशारा दिला आहे .

### न्यायालयीन कामकाजाच्या नावाखाली दिशाभूल

हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून काही करू शकत नाही अशा प्रकारे शासकीय अधिकारी सांगून दिशाभूल करीत असल्याचा आरोप सुभाष देव्हडे पाटील यांनी केला. या प्रकरणी न्यायालयाने कोणताही स्थगिती दिली नसून हे प्रकरण फक्त न्यायालयात दाखल आहे. यावर कोणत्याही प्रकारची सुनावनी व स्थगिती झाली नाही. शासनाची करोडो रूपयाची जाग हडप करून अधिकारी व पुढारी दिशाभूल करत असल्याचा आरोप देव्हडे पाटील यांनी केला आहे..

### अधिकारी व पुढाऱ्याची मिलीभगत

**शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. शासकीय जागा असूनही अधिकारी गुन्हे दाखल करून संचालक मंडळावर कारवाई करीत नाही. शिवाय जागाही ताब्यात घेत नाहीत. त्यामुळे अधिकारी व पुढाऱ्याची मिलीभगत असल्याचे दिसून येते. या प्रकरणी संबंधीत संचालकांवर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी सुभाष देव्हडे पाटील यांनी केली आहे.**



जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम
काटा रोड, वाशिम-४४४५०१
दूरध्वनी ०७२५२-२३३६१३ फॅक्स ०७२५२-२३२८५८
ईमेल :rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://washim.nic.in

क्र.कक्ष-८/अका(गृह)/कावि-५११९ /२०१७ दिनांक ०६-१२-२०१७

आमरण उपोषण ईशारा महत्वाचे
कालमर्यादा

प्रति,
प्रभारी अधिकारी,
महसूल विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम

विषय- आर.ए.कॉलेज वाशिम यांनी शासनाचे शिट नं.२७/२३ या जागेवर शासनाचे यु.जी.एस.सी.योजने अंतर्गत अनुदान घेवून मुलिंचे वसतीगृह अवैधरित्या बांधकाम केले व जागा १०२८१ चौ.मी.अनाधीकृतपणे हडप केली आहे. त्यांचेकडून सदर जागा व इमारत सरकारच्या ताब्यात घ्यावी. त्यांनी केलेल्या चुकीच्या कामामुळे त्यांचेवर फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करावे अन्यथा न्याय मागणीसाठी आमरण उपोषणा बाबत.

संदर्भ- श्री.सुभाष उत्तमराव देव्हडे पाटील (सामाजिक कार्यकर्ते) रा.दुबळवेल ता.मालेगांव ह.मु.छत्रपती शिवाजी नगर, कोंडाळा रोड,वाशिम ता.जि.वाशिम यांची आमरण उपोषणाची नोटीस दिनांक ०५-१२-२०१७ प्राप्त दिनांक ०५-१२-२०१७

---oo---

उपरोक्त संदर्भाकींत विषयाचे अनुषंगाने श्री.सुभाष उत्तमराव देव्हडे पाटील (सामाजिक कार्यकर्ते)रा.दुबळवेल ता.मालेगांव ह.मु.छत्रपती शिवाजी नगर, कोंडाळा रोड, वाशिम ता.जि.वाशिम यांची विषयांकीत आमरण उपोषणाची नोटीस दिनांक ०५-१२-२०१७ रोजी या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

यासोबत प्राप्त झालेल्या नोटीसची मुळ प्रत संलग्न करुन पुढील कार्यवाहीस्तव आपणाकडे पाठविण्यात येत आहेत. त्यांचे नोटीस मधील वस्तुस्थिती तपासून नियमानुसार योग्यती कार्यवाही करावी तसेच केलेल्या कार्यवाही बाबत संबधितांना परस्पर अवगत करुन त्यांना या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसन्या पासून परावृत्त करावे.

जिल्हाधिकारी वाशिम,करीता

सहपत्र- वरिल प्रमाणे
प्रतिलीपी,
१. मा.जिल्हा पोलीस अधिक्षक,वाशिम यांना नोटीसचे छायांकीत प्रतिसह माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
२. श्री.सुभाष उत्तमराव देव्हडे पाटील (सामाजिक कार्यकर्ते) रा.दुबळवेल ता.मालेगांव ह.मु.छत्रपती शिवाजी नगर, कोंडाळा रोड,वाशिम ता.जि.वाशिम यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषीत.

जिल्हाधिकारी वाशिम,करीता

हेच ते पत्र

## थोडक्यात

### सार्वजनिक वाचनालय परिसरातील ओपन जिमचे लोकार्पण



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शहरातील स्व.वसंतराव नाईक सार्वजनिक वाचनालय परिसरात आमदार श्याम खोडे यांच्या विशेष सहकार्य निधीतून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक ओपन जिमचे लोकार्पण रविवार (दि. १२) आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना नियमित व्यायामासाठी सुलभ आणि मोफत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम साकारण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार श्याम खोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष अशोक परळीकर, सुरेश लुंगे, सुनील मालपाणी, गटनेते गणेश खोडे, वीरेंद्रसिंह ठाकूर, प्रा. नंदलाल पवार, शहराध्यक्ष अभिषेक दंडे, नगरसेवक सुधीर घोडचर, गणेश बजाज, ॲड. राजेश्वर पांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रमोद घोडचर यांनी केले, तर गोविंद राठोड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजू जयस्वाल,प्रकाश संगत,बाळू दिवेकर, शारीकभाई, गोपाल शिंदे, बाळासाहेब घोडचर, अजहर,मो शफी,विजय भोजने, गोपाल क्षीरसागर, गोपाल वर्मा, कैलास थोरात, सचिन पवार, उमेश भोजने, शेख नावेद यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.ओपन जिमच्या लोकार्पणामुळे शहरातील नागरिकांना आधुनिक व्यायाम सुविधा उपलब्ध झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः सकाळ व सायंकाळच्या वेळेत मोठ्या संख्येने नागरिक या सुविधेचा लाभ घेतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# बळीराजाची हाक: बा विठ्ठला, जरा ढगाला हलव रे...!

● सिटी न्युज ब्युरो @ कवठा ●

आषाढी एकादशीच्या वारीत लाखो वारकरी ज्ञानोबा-तुकारामांचा गजर करत पंढरपूरच्या दिशेने चालले आहेत. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भक्तांची पाऊले वागणे पडत असताना, तालुक्यातील घोटा चिखली, परिसरात बळीराजा मात्र शिवारात उभा राहून एकच हाक देत आहे - 'बा विठ्ठला, जरा ढगाला हलव रे!' कारण, विठ्ठलाच्या एका शरीरात आतबाहेर स्वयंची पिके, हजारो कुटुंबाचे भविष्य आणि संपूर्ण प्रामाणिक अर्थव्यवस्थेचा श्वास अडकला आहे.





यावर्षीच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच निसर्गाने रिसोड तालुक्याकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. जूनमध्ये झालेल्या दोन-तीन दिवसांच्या पावसामुळे शेतकऱ्यांनी आशेने मशागत केली, महागडी बियाणे व खते घेतली आणि पेरणी पूर्ण केली. मात्र त्यानंतर पावसाने अशी दडी मारली की, आज शिवारातील हिरवेगार दिसणारे पिकेही करपू लागली आहेत. शेतकरी अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. जे शेतकरी घास करून पेरणी करून बसले, त्यांची सोयाबीन, मूग, उडीद, तूर यासारखी कोवळी पिके आता उन्हाच्या तडाख्याने मान टाकू लागली आहेत. जमिनीतील ओलावा पूर्णपणे संपल्याने अंकुरलेली पिकेही करण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली आहेत. परिसरातील घोटा चिखली, आहे की, ज्या शेतकऱ्यांकडे विहीर किंवा बोअरवेल आहे ते तुषार सिंचनाच्या मदतीने

### उगवलेली पिके करपू लागली, तुषारावर खरीपाचा श्वास...

कसाबसा पिकांचा जीव वाचवत आहेत. मात्र तालुक्यातील बहुतेक शेती अजूनही पावसावरच अवलंबून असल्याने हजारो शेतकरी असहाय्यपणे आकाशाकडे पाहत आहेत. विहिरीची पाणीपातळी झपाट्याने खालावत असून, अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे.

कृषी तज्ञांच्या मते, आता काही दिवसात दमदार पाऊस झाला नाही, तर यंदाच्या पेरण्यामुळे उत्पादनात मोठी घट होईल. आधीच पेरणी केलेल्या शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. म्हणून पुन्हा बियाणे, पुन्हा खते आणि पुन्हा मशागतीचा खर्च-आर्थिकदृष्ट्या सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हे दुसरे चटका देणारे आहे.रिसोडची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर खरीप हंगामावर अवलंबून आहे. शेतात पैसे आला तर बाजारपेठ, व्यापारी, नोकर, वाहतूक, खत-बियाणे विक्री यांच्याही व्यवसायांना गती मिळते. मात्र यंदा पाऊस लांबल्यास फटका केवळ शेतकऱ्यांनाच नाही, तर संपूर्ण ग्रामीण अर्थचक्रालाच बसण्याची शक्यता आहे.

आषाढीच्या वारीत भक्त विठ्ठलाकडे सुख-समृद्धीची याचना करत असताना, उदगीरचा बळीराजा मात्र आपल्या शिवारासाठी फक्त एका पावसाच्या सरशीची भीक मागत आहे. पुढील काही दिवसात समाधानकारक पाऊस झाला तरच खरीपाला जीवनदान मिळेल. अन्यथा घोटा, चिखली येथील शेतरावर दुष्काळाची सावली अधिक गडद होण्याची भीती निर्माण झाली आहे.

## वाशीममध्ये वैदिक गणित कार्यशाळा

### विद्यार्थी, शिक्षक व पालकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विद्या भारती विदर्भ, जिल्हा वाशीम यांच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण व्हावी, जलद व सोप्या गणितीय पद्धतींचा परिचय व्हावा तसेच स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने दोन दिवसीय वैदिक गणित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा बुधवार, दि. १५ जुलै व गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत रेखाबाई राष्ट्रीय विद्यालय, वाशीम येथे होणार आहे. या कार्यशाळेस नागपूर येथील शेफालीताई जोशी या मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते होणार असून, प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.याशिवाय कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून विधीज्ञ विजयराव जाधव (संरक्षक, विद्या भारती), विधीज्ञ सत्यानंद कांबळे (उपाध्यक्ष, विद्या भारती विदर्भ प्रांत) तसेच विद्यावाचस्पती प्रा. दिलीप जोशी (सहमंत्री, विदर्भ प्रांत) यांची उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यशाळेचा लाभ सर्व शिक्षक, विद्यार्थी व इच्छुकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल धूमकेकर, जिल्हामंत्री प्रा. श्रीकांत जोशी, प्रा. विशाल कोल्हे, प्रा. मनोज सुतवणे, अशोक बोंद्रे, अतुल देशमुख, लुंबिनी कांबळे तसेच विद्या भारती जिल्हा वाशीमची संपूर्ण कार्यकारिणी परिश्रम घेत आहे.

## रोहींचा-हरिणांचा धुमाकूळ; वनविभाग झोपेत!

### सोयाबीन, तूर, पिके फस्त; बळीराजा हवालदिल...

● सिटी न्युज ब्युरो @ कवठा ●

घोटा, चिखली, परिसरातील शेतशिवारात रोही आणि हरिणांच्या कळपांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी केली आहे. सोयाबीन, तूर आणि या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, वनविभागाच्या कथित निष्क्रियतेविरोधात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दररोज सकाळी व रात्री २० ते ३० रोही व हरिणांचे कळप



शेतात घुसून पिके फस्त करत आहेत. केवळ पिके खाणेच नव्हे, तर घातपात करून संपूर्ण शेत तुडवत असल्याने अनेक एकरावरील सोयाबीन,तूर पिके धुळीत झाली आहेत. त्यामुळे कर्ज काढून आणि उसनवारी करून शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.रात्री शेताची राखण करणेही जीवावर बेतत



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
पिके वाचवण्यासाठी 'जुगाड', रात्र जागून काढण्याची आली वेळ...
वन्यप्राण्यांच्या हैदोसाने शेतकरी हवालदिल !
घोटा, चिखली, परिसरात वन्यप्राण्यांचा हैदोस !

असल्याने शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेळा वनविभागाकडे तोंडी तक्रार केली.

**कर्ज फेडायचे कसे आणि जगायचे कसे...**

असा आता सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांनी वनविभागाकडे रोही व हरिणांचा तातडीने बंदोबस्त करण्याची, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून त्वरित आर्थिक भरपाई देण्याची मागणी केली आहे. अन्यथा वनविभागाच्या कार्यालयावर आंदोलन छेडण्यात येईल, घोटा, चिखली, परिसरातील बळीराजा संकटात असताना वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा शेतकऱ्यांचा संताप उग्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कॉँग्रेसचे रघुपती राघव राजाराम 'सत्याग्रह' आंदोलन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हा कॉँग्रेस कमिटी तर्फे आज दिनांक १४ जुलै २०२६ रोजी वाशिम येथील श्री राम मंदिर, बालाजी मंदिर, शनी मंदिर येथे 'रघुपति राघव राजाराम सत्याग्रह'संपन्न झाला. वाशिम येथील श्रीराम मंदिर , शनी मंदिर, बालाजी मंदिर अशी टाळ मृदंगाच्या गजरात दिंडी काढण्यात आली होती बालाजी मंदिर येथे दर्शन, भजन, आरती व प्रसाद असा कार्यक्रम करण्यात आला. तसेच शनी मंदिर दर्शन व भजन करण्यात आले.

जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी यांनी भगवान श्री प्रभू रामाला साकडे घातले हे प्रभू रामा तुझ्या आयोध्या येतील श्रीराम मंदिरातील ट्रस्टी व कर्मचाऱ्याद्वारे दानपेटीतील रक्कम लुटल्या गेली तसेच सोन्या चांदीचे दागिने मौल्यवान वस्तू सुद्धा चोरून नेल्या गेल्यात






खोट्या पावत्या छापून भाविकाच्या देणगीचा अपहार करण्यात आला तरी या सर्व अपहार व चोरी करणाऱ्या मंडळींना प्रभू श्रीराम सदबुद्धी देवो अशी अशी प्रार्थना केली.

वाशिम येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सुद्धा सर्व मंडळीला सोबत घेऊन हार अर्पण केला आणि वाशिम जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित केलेले 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रहाचा' समारोप करण्यात आला. हा सत्याग्रहाचा कार्यक्रम वाशिम जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजू भाऊ चौधरी यांच्या नेतृत्वात करण्यात आला या कार्यक्रमाला एडवोकेट दिलीपराव सरनाईक महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, किसनरावजी मस्के माजी सभापती जिल्हा परिषद वाशिम, माजी जिल्हा परिषदेचे सदस्य दिलीपराव देशमुख, तालुका कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महादेवराव सोळंके, तालुका कॉँग्रेस कमिटीचे कारंजा येथील अध्यक्ष विजयराव देशमुख, परसरामजी भोयर, गजानन गोटे, राजू वानखेडे नगरपरिषद सदस्य वाशिम, माजी उपसभापती पंचायत समिती वाशिम, सागर गोरे माजी नगरपरिषद सदस्य, समाधान माने, उज्वल देशमुख, निर्मल बसंतवाणी, दादाराव देशमुख, हरीश चौधरी, सुरेश रत्नपारखी, नयन करे, सुभाषराव देशमुख, संतोष गावंडे तात्या, विश्वनाथ भालेराव, काशिनाथ बोके, दामू अण्णा काळे, भीमराव लोखंडे सर, सुनील मापारी, बबन हिरवे, गणेश चव्हाण, नामदेव राव आघाव, मनोज गोरे, गणेश धोटे, मोहन चौधरी, बबन चौधरी, प्रकाश चौधरी, शंकर वाघ, सुखदेव उगले, पुंडलिक भालेराव सर, वसंता महाले, कृष्णा तागड, पुंडलिक कुंभार, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर अखंड, बाळासाहेब रोकडे, बाळासाहेब लेमले,कपिल सोळंके, विठ्ठल खुळे, अनिल धुळे, ईश्वर राठोड, शालिग्राम राठोड, मदन चव्हाण, निळू भाऊ ढगे, मुरलीधर शिंदे, संतोष गावंडे गोंडेगाव, विठ्ठल वानखेडे, दिनेश चौधरी, सुरेश चौधरी, संकेत चौधरी. तसेच या कार्यक्रमाच्या करिता वाशिम तालुक्यातील बरीच वारकरी मंडळी उपस्थित होती त्या मध्ये ह. भ.प. पंढरी पाटील इंगोले, ह.भ.प. नथू महाराज बोरकर, केशव महाराज काळे, विश्वनाथ महाराज चौधरी, नंदकिशोर चौधरी, भिकाजी महाराज इंगळे, विलास घुगे, वाई येथील नागोराव उगले, जनार्धन मसके, झनक मस्के, शंकूराव वडकुते, विलासराव जाधव, सकाराम मस्के, तसेच जांभरुण महाली येथील शिवाजी चौधरी, संतोष कोरडे, भारत ठाकरे तसेच मृदंगाचार्य विवेक महाराज इंगोले हे सहभागी झाले होते.

## शिवसेना (उबाठा) वाशीम शहर प्रमुखपदी गजानन जोगदंड यांची नियुक्ती!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वाशीम जिल्ह्यातील संघटनात्मक नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार या नियुक्त्या करण्यात आल्या असून, गजानन जोगदंड यांची वाशीम शहर प्रमुख म्हणून नियुक्ती जिल्हा प्रमुख बालाजी वानखेडे यांनी केली.

यावेळी संपर्क प्रमुख डॉ. सुधिर कव्हर,गजाननराव वडजीकर हे उपस्थित होते. याचबरोबर गजानन भांदुरगे यांची शहर संपर्क प्रमुख, गणेश गाभणे यांची शहर संघटक तर रोहित बढेल यांची शहर समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त शहर प्रमुख गजानन जोगदंड



हे वाशीम नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष असून, त्यांनी पक्षाने दिलेल्या जबाबदारीबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. शहरातील शिवसेना संघटना अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षाची भूमिका सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कार्यरत राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या नियुक्त्यांमुळे वाशीम शहरातील शिवसेना उबाठा पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा पक्ष कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या निवडीचे अभिनंदन धनंजय सोळंके यांनी केले.

# जुलैतच पावसाने पाठ फिरवली; पेरण्या धोक्यात!

प्रतिनिधी १५ जुलै

**बुलढाणा** : खरीप हंगामाच्या निर्णायक टप्प्यावर पावसाने बुलढाणा जिल्ह्याकडे अक्षरशः पाठ फिरवली आहे. जुलैच्या सुरुवातीला दिलासा दिल्यानंतर १० जुलैपासून सलग पाच दिवस जिल्ह्यात एक थेंबही पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. जिल्ह्यात ८५ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या असतानाच अंकुरलेली पिके कोमेजण्याच्या मार्गावर असून, पाऊस लांबल्यास अनेक भागांत दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची भीती व्यक्त होत आहे. कृषी विभागाच्या आकडेवारीनुसार, जिल्ह्यात आतापर्यंत १८७.७मिलिमीटर पाऊस झाला असून, तो वार्षिक सरासरी ७६१.६ मिलिमीटर पर्जन्यमानाच्या केवळ २४.६५ टक्के आहे. जुलै महिन्याचा विचार करता, १४ जुलैपर्यंत केवळ ७५.७मिलिमीटर पाऊस झाला असून, तो जुलैच्या सरासरी १९२.२ मिलिमीटर पावसाच्या अवघ्या ३९.४ टक्के आहे.

१ ते ९ जुलैदरम्यान जिल्ह्यात तुरळक स्वरूपाचा हलका ते मध्यम पाऊस झाला. त्यात ९ जुलै रोजी सर्वाधिक १८.३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. २ जुलैला ११.८, तर १, ४ आणि ५३९ टक्केच पाऊस १४ जुलैपर्यंत पडला आहे.




## पुढील पाच दिवसही दिलासा नाही!

» प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस बुलढाणा जिल्ह्यात हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याची शक्यता आहे. पावसाला पोषक स्थिती नसल्याने शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचे नियोजनपूर्वक सिंचन करावे आणि शेतीची कामे हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन करावीत, असा सल्ला बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्रातील हवामान तज्ज्ञांनी दिला आहे. जुलै रोजी अनुक्रमे १०.३ व १०.४ मिलिमीटर पाऊस झाला. मात्र त्यानंतर सर्वच दिवस पर्जन्यमान शून्य राहिले. पावसातील या खंडामुळे सोयाबीन, कापू, तूर आणि अन्य खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता कृषितज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# 100 हून अधिक क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचे वितरण

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १५ जुलै

**बुलढाणा** : प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केलेल्या आवाहनाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या आठवडाभरात १०० पेक्षा अधिक क्षयरुग्णांना 'निक्षय मित्र' उपक्रमातून पोषण आहार (फूड बास्केट) किटचे वितरण करण्यात आले आहे.

या समाजातील विविध संस्था, स्वयंसेवी संघटना, लोकप्रतिनिधी, दानशूर व्यक्ती आणि नागरिकांनी पुढाकार घेत क्षयरुग्णांना दत्तक घेण्यास सुरुवात केली आहे. भारताला २०२५ पर्यंत क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या वतीने 'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत क्षयरुग्णांना नियमित औषधोपचारासोबतच सकस व पोषक आहार मिळणे आवश्यक असल्याने 'निक्षय मित्र' संकल्पना राबविण्यात येत आहे. यामध्ये इच्छुक व्यक्ती, संस्था किंवा उद्योगसमूह क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना दरमहा पोषण आहार उपलब्ध करून देतात. जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, 'क्षयरोग हा केवळ वैद्यकीय विषय नसून सामाजिक समस्याही आहे. योग्य उपचारांसोबत पोषणयुक्त आहार मिळाल्यास रुग्णाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि तो लवकर बरा

होतो. जिल्ह्यातील एकही क्षयरुग्ण पोषणापासून वंचित राहू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा. आपल्या छोट्याशा सहकार्यामुळे एका रुग्णाला नवजीवन मिळू शकते.' इच्छुक नागरिकांनी निक्षय मित्र म्हणून नोंदणी करण्यासाठी जिल्हा क्षयरोग विभाग अथवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

अभियानाला मिळालेल्या प्रतिसादातून बुलढाणा येथील सहयोग ग्रुपने २५ क्षयरुग्णांना दत्तक घेत त्यांना पोषण आहार किटचे वितरण केले. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.

प्रविणकुमार देवरे, अप्पर जिल्हाधिकारी रमेश घेवंदे, उपजिल्हाधिकारी रुपेश खंडारे, नायब तहसीलदार नागेश खरात, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा श्रीधर गुट्टे, डॉ. राजेश्वर उबरहंडे, डॉ. आशिष खासबागे, डॉ. गणेश गायकवाड तसेच सहयोग ग्रुपचे कुणाल पैठणकर, भारत काटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याच अभियानांतर्गत मेहकर तालुक्यातील सुबोध युवक कल्याण मंडळ, डोणगाव यांनीही सामाजिक बांधिलकी जपत मे आणि जून महिन्यात उपचार घेत असलेल्या तालुक्यातील सर्व क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वितरण केले.

# शाळेसमोर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री; कोटपा कायद्यान्वये गुन्हा दाखल

प्रतिनिधी १५ जुलै

**मलकापुर** : जिल्हा परिषद शाळेसमोर तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या एका विक्रेत्यावर मलकापूर शहर पोलिसांनी कारवाई करून कोटपा (COT-PA) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ३२५ रुपयांचा तंबाखूजन्य पदार्थांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १३ जुलै रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास मलकापूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार आसिफ शेख यांनी पंचांसमक्ष जिल्हा परिषद शाळेसमोर छापा टाकला.

यावेळी मोहम्मद शौकत मोहम्मद सुलेमान (वय ६०, रा. चारखंबा चौक, मलकापूर) हा शाळेच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करताना आढळून आला.

कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातून १५ पुड्या गुलाब तंबाखू (७५ रुपये), २० पुड्या गाय छाप तंबाखू (२०० रुपये) आणि ५ उंट बिडी (५० रुपये) असा एकूण ३२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५१८/२०२६ दाखल करण्यात आला असून सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थ (जाहिरात प्रतिबंध व व्यापार, उत्पादन, पुरवठा व वितरण नियमन) अधिनियम (COTPA) २००३ मधील कलम ६ व २४ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून तपासाची जबाबदारी संबंधित तपास अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे.

# चिमुकलीच्या गळ्यातील सोनसाखळी चोरीला !

प्रतिनिधी १५ जुलै

**खामगाव :** शहरातील एका खासगी प्रसूतिगृहात नातेवाइकांना भेटण्यासाठी आलेल्या महिलेच्या अडीच वर्षीय मुलीच्या गळ्यातील सोनसाखळी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विशाखा निखील दामोदर (२९, रा. कान्हेरी सरप, ता. बार्शी टाकळी, जि. अकोला) या ११ जुलै रोजी रात्री ८:१० ते ८:३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मावस बहिणीची प्रसूती झाल्याने तिला भेटण्यासाठी खामगावातील प्रसूतिगृहात आल्या होत्या. त्यांच्यासोबत अडीच वर्षीय मुलगी निवीता हिचीही उपस्थिती होती. दवाखान्याच्या परिसरात निवीता खेळत असताना तिच्या गळ्यातील सुमारे ३ ग्रॅम वजनाची, अंदाजे १२ हजार रुपये किमतीची सोनसाखळी अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

# टिनशेडला आग, साहित्य खाक

प्रतिनिधी १५ जुलै

**जळगाव जामोद** : तालुक्यातील अकोला खुर्द शिवारातील गट क्रमांक २५ मधील शेतातील टिनशेडला अज्ञात कारणाने आग लागून सुमारे १ लाख ५० हजार रुपयांचे कृषी उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे शेतकरी विनोद लक्ष्मण सातव (५६) यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सोमवारी शेतीची कामे आटोपून घरी गेल्यानंतर मंगळवारी सकाळी शेतात पोहोचल्यावर टिनशेड जळालेल्या अवस्थेत आढळले. माहिती मिळताच तलाठी राहाटे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, ठाणेदार सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद मोरे पुढील तपास करीत आहेत. जळालेल्या साहित्यात या वस्तूंचा आहे समावेश आगीत अडीच इंची स्प्रिंकलरचे ३० पाईप व ११ नोजल, दोन इंची स्प्रिंकलरचे ३० पाईप व १२ नोजल, एक हेक्टर क्षेत्रासाठीचे ठिबक सिंचन साहित्य, २५ किलो सोयाबीन बियाणे, बी-बियाणे, कीटकनाशके, झटका मशीन तसेच अन्य शेती उपयोगी साहित्य जळून नष्ट झाले. तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी शेतीसाठी आवश्यक सिंचन साहित्य व बियाणे आगीत नष्ट झाल्याने संबंधित शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. पंचनाम्यानुसार नुकसानभरपाई मंजूर करून शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# श्रींच्या पालखी स्वागतासाठी 1.51 लाख मोदकांचा महाप्रसाद

## खामगावात सलग चौथ्या वर्षी अनोखा उपक्रम

प्रतिनिधी १५ जुलै

**खामगाव :** श्री गजानन महाराजांप्रती असलेली अखंड श्रद्धा, सेवाभाव आणि सामूहिक भक्तीचा अनोखा संगम यंदाही खामगावात अनुभवायला मिळणार आहे. श्री गजानन महाराज उपासना परिवार, महाराष्ट्र यांच्या वतीने शेगावच्या श्री गजानन पालखी महाराजांच्या स्वागतासाठी १ लाख ५१ हजार १११ मोदकांचा महानैवेद्य अर्पण करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पंढरपूरहून परतीच्या प्रवासाला निघालेली पालखी १८ ऑगस्ट २०२६ रोजी खामगावात दाखल होताच हा भक्तिमय सोहळा पार पडणार आहे. उपक्रमाचे हे सलग चौथे वर्ष आहे.

पालखी आगमनानंतर श्री गजानन महाराजांना मोदकांचा महानैवेद्य अर्पण करण्यात येईल. त्यानंतर हा महाप्रसाद खामगाव ते शेगाव मार्गावरील पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकरी, भाविक आणि नागरिकांना वितरीत केला जाईल. या उपक्रमासाठी तयार होणारे सात्त्विक मोदक खोबरे, पिठीसाखर, वेलदोडा आणि मिश्रीच्या सारणापासून बनविले जातात. कोणतेही संरक्षक पदार्थ न वापरता तयार केलेले हे मोदक आठ दिवस टिकतात. विशेष म्हणजे, मातृशक्तीच्या हस्ते भक्तिभावाने तयार होणाऱ्या या प्रसादामुळे उपक्रमाला सेवाभावाचे वेगळे अधिष्ठान लाभले आहे. हा केवळ मोदकांचा महाप्रसाद नाही, तर राज्यभरातील भक्तांना भक्ती, सेवा आणि समर्पणाच्या एका सुत्रात बांधणारा लोकसहभागाचा उपक्रम आहे ५१ संकलन केंद्रांतून आणि विशेषतः मातृशक्तीच्या उत्स्फूर्त सहभागातून हा भक्तीयज्ञ अधिक व्यापक होत असून या महायज्ञाच्या तयारीसाठी राज्यातील भाविकांची ऑनलाइन बैठक घेण्यात आली आहे.

# ई-केवायसी न झाल्याने लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

प्रतिनिधी १५ जुलै

**उदयनगर :** महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेमध्ये ई-केवायसी न केल्याने उदयनगर परिसरातील अनेक लाडक्या बहिणीचे दरमहा १५०० रुपयाचे हप्ते येणे बंद झाले आहे. करिता त्या लाडक्या बहिणींना पुन्हा ई-केवायसी प्रक्रिया कधी सुरू होते, याकडे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र शासनाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आलेली असून या योजनेअंतर्गत पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात दरमहा पंधराशे रुपये डीबीटी अंतर्गत तात्काळ जमा केल्या जातात. या योजनेत परिसरातील बहुसंख्य गोरगरीब महिला असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहसाठी मोल मजुरी करतात तर येणाऱ्या पंधराशे रुपयाच्या हप्त्यांमधून अनेक लाडक्या बहिणी घरी किराणा, त्याचा दरमहा होणारा मेडिकल, दवाखाना खर्च तर गोरगरीब लाडक्या बहिणींचे पाल्य शिक्षणासाठी बाहेरगावी आहेत. त्यांना त्यामधून शिक्षणासाठी खर्च केला जातो. त्यामुळे लाडकी बहीण योजना गरीब



मजूर कुटुंबासाठी वरदान ठरली. परंतु या योजनेत मागील ३ ते ४ महिन्यांपूर्वी ईकेवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. याची माहिती मिळताच ज्या लाडक्या बहिणी साक्षर आहेत. अथवा ज्यांना माहिती मिळाली. त्यांनी ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण केली. परंतु ज्या दिवसभर मोल मजुरी करून उदरनिर्वाह करतात. त्या मात्र या प्रक्रियेपासून दूर राहिल्या परिणामी त्यांचे दरमहा पंधराशे रुपये येणे बंद झाले. उदयनगर परिसरातील बहुसंख्य लाडक्या बहिणी ईकेवायसीपासून वंचित आहेत. तरी ज्या लाडक्या बहिणी लाभापासून वंचित आहे. त्यांचेसाठी शासनाने ईकेवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करावी अशी मागणी होत आहे.

# 17 दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने केली खाली

प्रतिनिधी १५ जुलै

**शेगाव** : उच्च न्यायालयाच्या आदेशाचा मान राखत शहरातील मंदिर परिसरातील मातंगवाडी येथील विस्थापित १७दुकानदारांनी मंगळवारी (दि. १४ जुलै) स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने खाली केली. मातंगवाडीतील दुकानदारांचे पुनर्वसन नव्याने उभारलेल्या पालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. मात्र, दुकान वाटपाच्या पद्धतीवरून वाद निर्माण झाला होता. न्यायालयाने दुकाने खाली करण्याचे आदेश दिल्यानंतर दुकानदारांनी सहकार्याची भूमिका घेतली. आम्ही न्यायालयाचा पूर्ण आदर करतो. त्यामुळेच स्वयंस्फूर्तीने दुकाने खाली केली, असे विस्थापित दुकानदारांनी सांगितले. त्याचवेळी शॉपिंग कॉम्प्लेक्समधील दुकाने लॉटरी पद्धतीऐवजी पसंतीक्रमानुसार वाटप करण्यात यावीत, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, प्रशासनाने विस्थापित दुकानदारांना पालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये मालकी हक्काने दुकाने देण्याची तयारी दर्शविली असून, सर्व १७दुकानदारांना अॅलॉटमेंट लेटर देण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# गोपाल सोनी मृत्यू प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी

## उद्धवसेनेचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**खामगाव** : शहरातील सोनी ब्लड बँकेचे संचालक डॉ. गोपाल सोनी यांच्या शेलोडी शिवारात झालेल्या संशयास्पद मृत्यूची सखोल व निष्पक्ष चौकशी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्यात यावी, अशी मागणी उद्धवसेनेने निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी (महसूल), उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच तहसीलदारांना देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. १२ जुलै रोजी शेलोडी शिवारात डॉ. गोपाल सोनी यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, सत्य परिस्थिती समोर येण्यासाठी निष्पक्ष आणि सर्वकष तपास होणे गरजेचे आहे. घटनेच्या दिवशी डॉ. सोनी यांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची माहिती, त्यांच्या मोबाइल कॉल डिटेल्स, व्हॉट्सअॅप संदेश, व्हिडिओ, तसेच घटनास्थळ परिसरात त्या वेळेस सक्रिय असलेल्या मोबाइल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करून तपास करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. ग्रामीण पोलिसांनी काही संशयितांची चौकशी सुरू केली असून, आणखी दोन व्यक्तींचा शोध सुरू असल्याच्या वृत्तामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे निर्माण वातावरण झाल्याचेही निवेदनात नमुद आहे. या प्रकरणात फॉरेन्सिक पथकाच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आल्याने पुढील तपासही स्वतंत्र व विश्वासार्ह यंत्रणेमार्फत म्हणजेच सीबीआयकडे सोपविण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर उद्धवसेनेचे शहरप्रमुख रवी भिकुलाल जैन यांच्यासह बाबा काळे, विकी जैन, अक्षय हातेकर, सुभाष ठाकूर, श्रीराम खेलदार, दीपक कांबळे, शुभम बावस्कर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विशेष पुनरीक्षण मोहिमेत चार 'बीएलओं'ची बाजी!

## 23 दिवसांत 100 टक्के डिजिटायझेशन

प्रतिनिधी १५ जुलै

**जळगाव जामोद** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत जळगाव जामोद मतदारसंघातील चार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी अवघ्या २३ दिवसांत इम्प्युटेशन फॉर्मचे १०० टक्के डिजिटायझेशन पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली. या कार्याबद्दल उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी शैलेश काळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विशेष पुनरीक्षण मोहिमेत बीएलओ प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी, आवश्यक माहितीचे संकलन व विहित नमुने भरून घेण्याचे काम करीत आहेत.

ही मोहीम ३० जून ते २७ जुलै २०२६ या कालावधीत सुरू असताना या चारही बीएलओंनी नियोजित मुदतीपूर्वीच काम पूर्ण करून आदर्श निर्माण केला. यावेळी शैलेश काळे यांनी इतर सर्व बीएलओंनीही वेळेत व अचूकपणे काम पूर्ण करण्याचे आवाहन केले.

**हे आहेत गौरव झालेले बीएलओ !**

अंगणवाडी सेविका सुनीता विजय मोरे, आशा सेविका सपना दिनेश सरणे (आडोळ बु.), अंगणवाडी सेविका सुनीता परमेश्वर वानखेडे (दत्तवाडी पाट्या) आणि सहायक अध्यापक वैभव ज्ञानेश्वर चव्हाण (भिंगारा) यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. **मतदारयादी विशेष पुनरीक्षण मोहिमेचे उद्दिष्ट!**

३० जून ते २७ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत प्रत्येक कुटुंबाला भेट देऊन मतदारांची माहिती पडताळणे, आवश्यक दुरुस्त्या करणे, विहित नमुने भरून घेणे आणि त्यांचे वेळेत डिजिटायझेशन करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रशासनाने नागरिकांना बीएलओंना आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# पूर्ववैमनस्यातून तिघांकडून तरुणावर जीवघेणा हल्ला; एक गंभीर जखमी

प्रतिनिधी १५ जुलै

**मलकापूर** : पूर्ववैमनस्यातून झालेल्या वादातून एका तरुणाला तिघांनी मारहाण करून फायटरने डोक्यात वार करीत गंभीर जखमी केल्याची घटना शहरातील मुश्ताक अली नगर परिसरात घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी तीन जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शेख रईस शेख महेमुद (वय ३२, रा. मुश्ताक अली नगर) यांचा भाऊ शेख नफीस हा ११ जुलै रोजी शाही ताजुद्दीन बाबा संदल कार्यक्रमासाठी नागपूर येथे गेला होता. त्यावेळी आरोपी अजहर वजीर मिर्झा, आबीद अनिस बागवान आणि शेख सरफराज शेख आरीफ यांच्यासोबत किरकोळ कारणावरून शाब्दिक वाद झाला होता. त्याच वादाचा राग मनात धरून आरोपींनी ठतुला तुझ्या गावात बघून घेतो,ठ अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मंगळवारी (दि. १४) रात्री सुमारे ९.१५ वाजता शेख नफीस हा मुश्ताक अली नगरातील अमीना मशिदीजवळील विहिरीजवळ मोबाईल पाहत बसला असताना तिन्ही आरोपी तेथे आले. त्यांनी नागपूर येथील वादाच्या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी अजहर मिर्झा याने हातातील फायटरने शेख नफीसच्या डोक्याच्या मागील बाजूस वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. जखमेतून रक्तस्राव सुरू झाल्याने तो खाली कोसळला. झटापटीदरम्यान त्याचा मोबाईलही हरविल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेची माहिती मिळताच फिर्यादी शेख रईस हे घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी आरोपी आबीद बागवान व शेख सरफराज यांनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच ठतुम्हा दोघांना संपवून टाकतो,ठ अशी धमकी देत तलवारीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दरम्यान, परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करून वाद मिटविला. या प्रकरणी मलकापूर शहर पोलिसांनी अजहर वजीर मिर्झा (अल्पवयीन), आबीद अनिस बागवान आणि शेख सरफराज शेख आरीफ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शेख करीत आहेत.

# डीबीटी पोर्टल 6 महिन्यांपासून बंद

## अनेक योजनांपासून शेतकरी वंचित

**अंढेरा:** केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या अनेक लाभाच्या योजना सरळ अनुदान हस्तांतरण योजनेअंतर्गत मंजूर करण्यात येतात. मात्र गेल्या डिसेबर महिन्यापासून सरकारच्या या डिबी टी पोर्टल वर अर्ज करूनही खरीप पेरणीमध्ये लागणाऱ्या अनेक शेती विषयक वस्तू त्यामध्ये सिपर्लर ठिबक सिंचन ट्रॅक्टर बी बियाणे रोटावेटर नागर अशा अनेक योजनेतील डिबीटी पोर्टलच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते. कृषी विभागाच्या सर्व योजना ह्या हे पोर्टल बंद असल्याकरणाने बासनात गुंडाळल्या आहेत सरकार चे याकडे दुर्लक्ष झाल्याने शेतकऱ्यांना याचा नाहक फटका बसला असून ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी हवालदिल झाला आहेत त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड बसला आहे. आपले सरकार महा DBT यामध्ये सातत्याने राज्य कृषी विभागाचा सर्वत्र बोलबाला असतो पण चक्क सहा महिने ही योजनेचे पोर्टल बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना लाभ घेणे अशक्य झाल्याने शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. हजारो शेतकरी थेट अनुदान हस्तांतरण म्हणजेच डिबीटी पोर्टलमुळे अनेक शेतकरी शेतीविषयक योजना पासून व प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहिले आहे हे विशेष अधिकारी म्हणतात ह्या योजना सर्व ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येतात त्यामुळे आमचा हस्तक्षेप त्यामध्ये नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचे हात वर असल्याचा प्रकार सुद्धा लक्षात आला आहे. कृषि विभागाने शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय योजना करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# अकोला जिल्ह्यात बोगस बियाणे कंपन्यांचा हैदोस

## कृषी आयुक्तालयाच्या भूमिकेवर संशयाची सुई

## बियाणे सॅम्पलचे अहवाल उशिराने का, उच्चस्तरीय चौकशीची मागणी !

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांचा मोठा फटका बसला असून, या संपूर्ण प्रकरणावरून आता जिल्हा कृषी विभाग आणि थेट राज्याच्या कृषी आयुक्तालयाची भूमिका संशयाच्या भोऱ्यात सापडली आहे. जिल्ह्यात बोगस बियाणे कंपन्यांनी उच्छाद मांडला असताना, कृषी प्रशासनाची ढिसाळ आणि संशयास्पद कामगिरी चव्हाट्यावर आली आहे. बियाणे उगवण क्षमता तपासण्याच्या सॅम्पलचे अहवाल उशिरा पाठविणाऱ्यांवर कारवाई का नाही. अशी विचारणा आता होत आहे.

जिल्ह्यात सोयाबीनच्या बोगस आणि सदोष बियाण्यांबाबत शेतकऱ्यांनी तक्रारींचा पाऊस पाडला आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात तक्रारींचा आकडा १४०० च्या पार (एकूण १,७२२ तक्रारी) गेला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, एवढ्या प्रचंड प्रमाणावर आलेल्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रशासनाकडे शासनाचे ७ आणि जिल्हा परिषदेचे ७ मिळून अवघे १४ निरीक्षक तैनात आहेत. या १४ निरीक्षकांच्या भरवशावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या फसवणुकीची चौकशी कशी होणार आणि शेतकऱ्यांना न्याय कसा मिळणार, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. त्यामुळे बोगस कंपन्यांना परवानग्यांचे वाटप करणाऱ्या आणि शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या कृषी आयुक्तालयाचीच आता उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून आणि लोकप्रतिनिधींकडून केली जात आहे.

### बियाणे कंपन्यांना अभय देणाऱ्या 'कृषी आयुक्तालयाची' चौकशी करा!

जिल्हा स्तरावरून बियाणे कंपन्यांना विक्रीची थेट परवानगी दिली जात नाही, तर ही सर्व सूत्रे राज्याच्या कृषी आयुक्तालयातून हलतात. अकोला जिल्ह्यात धुमाकूळ घालणाऱ्या बुस्टर सीड्स , रवी सीड्स , ओसवाल सीड्स, उन्नती आणि इनोव्हेज यांसारख्या कंपन्यांना कृषी आयुक्तालयाने डोळे झाकून परवानग्या दिल्याच कशा, हा आता सर्वात मोठा यक्षप्रश्न आहे. या कंपन्यांबद्दल तक्रारी आल्या असताना तो सोडविण्यासाठी शासन स्तरावर कुठली उपाय योजना आहे. त्याच बरोबर ज्या शेतकऱ्यांचे खरिप हंगामात हे नुकसान झाले त्या कोरडवाहू शेतकऱ्यांची मदत कोण करणार अशी विचारणा शेतकरी करत आहे.

### 'सोयाबीनचे मे महिन्यात सॅम्पल घेऊ नका!' – हा अजब आदेश कोणाचा?

या संपूर्ण घोटाळ्यात सर्वात संशयास्पद आणि गंभीर बाब म्हणजे, 'मे महिन्यात सोयाबीनचे सॅम्पल (नमुने) घेऊ नका,' असा एक अजब अलिखित नियम किंवा आदेश पुढे आला आहे. सोयाबीनची सॅम्पलिंग केवळ जून आणि जुलै महिन्यातच केली जाते, असे कारण पुढे केले जात आहे. कृषी आयुक्तालयात कोणी हा आदेश दिला अशी विचारणा आता होत आहे. जर मे महिन्यात बियाणे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होते आणि शेतकरी ते खरेदी करत होते, तर मग मे महिन्यात त्याचे नमुने घेण्यास कोणी आणि का मज्जाव केला ? हा आदेश नेमका कोणाचा होता ? बोगस बियाणे कंपन्यांना मे महिन्यात मोकळे रान देऊन शेतकऱ्यांची लूट करण्यासाठीच हा जाणीवपूर्वक उशीर करण्यात आला का ? लॅबचे रिपोर्ट २१ दिवसांनी उशिरा येण्यामागे कोणाला वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे ?

# विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेचा टॅक्स वसुलीवर परिणाम

## भविष्यातील विकास योजनांवर होईल परिणाम

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** सध्या महानगरपालिकेचा कर विभाग अतिरिक्त कामाच्या भाराशी झुंजत आहे. कर विभागाचे कर्मचारी विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेत व्यस्त आहेत. याचा परिणाम नियमित कर संकलन मोहिम, कर न भरणाऱ्यांना नोटिसा बजावणे, वैयक्तिक तपासणी, आणि जप्ती कारवायांवर झाला आहे.

**दिवसेंदिवस वाढत आहे मालमत्ता कराची थकबाकी**

शहरातील मालमत्ता कराची थकबाकी दिवसेंदिवस वाढत असून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चिंताजनक झाली आहे. मालमत्ता धारकांवर 204 कोटी रुपयांची थकबाकी असून प्रशासन ती वसूल करण्यात अपयशी ठरत आहे. परिणामी महापालिकेच्या तिजोरीवर प्रचंड दबाव आला आहे . आणि विकास प्रकल्प, कंत्राटदारांचे देयक, व दैनंदिन प्रशासकीय खर्च भागवण्यासाठी प्रशासन धडपडत आहे. कर वसूल करण्यासाठी अभय योजना, माफी आणि जप्ती यासारख्या अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. परंतु अपेक्षित परिणाम साध्य झाला नाही. तर दुसरीकडे विशेष सखोल मतदार पुनरिक्षण च्या कामासाठी कर विभागाच्या कर्मचाऱ्यांवरील वाढत्या दबावामुळे कर वसुली मोहीम अक्षरशः ठप्प झाली आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेला महसूल उभारण्यात प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मानला जातो. शहराला रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, बगीचे, आरोग्य सुविधा, आणि इतर नागरि सेवांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. हा निधी प्रामुख्याने मालमत्ता करातून मिळतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून कर वसुली मंदावली आहे आणि थकबाकी सातत्याने वाढत आहे.

**बिल मिळत नसल्याने कंत्राटदारही नाराज?**

कर वसुली न झाल्याने महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट जाणवत आहे. ज्यामुळे अनेक विकास प्रकल्पांच्या देय रकमेवर परिणाम होत आहे. शहरातील रस्ते, नाले, पाणीपुरवठा, आणि इतर कामें करणाऱ्या कंत्राटदारांना वेळेवर पैसे देणे प्रशासनाला अवघड जात आहे. यामुळे विकास कामाची गती मंदावत आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मोठा भाग टॅक्स वसुलीतून येतो. त्यामुळे थकबाकी वसूल न झाल्यास भविष्यातील विकास योजनांवर याचा परिणाम होणे निश्चित आहे. मध्यंतरी महापालिका प्रशासनाने टॅक्स थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करण्याचा इशारा दिला होता. मात्र हे प्रत्यक्षात झाले नाही भविष्यात ठोस कारवाई न केल्यास प्रशासनाला मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल.

# बोगस सोयाबीन प्रकरण, दोषींवर कारवाई कधी?

प्रतिनिधी १५ जुलै

**हिवरखेड :** परिसरात बोगस किंवा निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांचे पीक उगवले नसल्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर असतानाच या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, काही कृषी सेवा केंद्रांनी बियाण्याच्या किमतीएवढे खत किंवा इतर कृषी साहित्य देऊन शेतकऱ्यांकडून "बियाण्याबाबत मी समाधानी आहे" असे लेखी पत्र लिहून घेतले. आता याच पत्राचा आधार घेत काही अधिकाऱ्यांकडून नुकसानभरपाईच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, बियाण्याची किंमत परत मिळणे हा वेगळा मुद्दा आहे; मात्र सोयाबीन उगवले नसल्याने दुबार पेरणी, मशागत, मजुरी, इंधन, वेळ आणि उत्पादनातील घट यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत केवळ बियाण्याच्या किमतीएवढे साहित्य देऊन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान भरून निघू शकत नाही. दरम्यान, या प्रकरणात संबंधित कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी अद्याप या प्रकरणाचा अंतिम अहवाल तयार झालेला नसल्याचे सांगितल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली आहे. यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. जर अहवालच तयार झालेला नाही, तर शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईबाबत निर्णय कधी होणार? दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई कधी होणार? आणि अहवाल पूर्ण होण्यास इतका विलंब का होत आहे? विशेष म्हणजे, एका बाजूला अहवाल तयार नसल्याचे सांगितले जात आहे, तर दुसऱ्या बाजूला "समाधानी" पत्राचा आधार घेऊन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणार नाही, असा संदेश दिला जात असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. त्यामुळे प्रशासनाची भूमिका नेमकी काय आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, अनेकांनी कर्ज काढून पेरणी केली होती. बियाणे उगवले नाही म्हणून पुन्हा पेरणी करावी लागली. अतिरिक्त खर्च झाला, वेळ गेला आणि पावसाच्या बदलत्या परिस्थितीचा फटका बसला. या सर्व नुकसानीची भरपाई कोण करणार, असा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे.

### शेतकरी प्रशासनाकडे पुढील मागण्या करत आहेत

» निकृष्ट किंवा उगवण न झालेल्या बियाण्यांच्या प्रकरणाचा अहवाल तातडीने पूर्ण करून सार्वजनिक करावा. सर्व बाधित शेतकऱ्यांचे पंचनामे आणि तपास पूर्ण करून नुकसानभरपाई निश्चित करावी. दोषी आढळणाऱ्या बियाणे उत्पादक कंपनी, विक्रेते किंवा इतर संबंधित जबाबदारांवर कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी.

"समाधानी" पत्र कोणत्या परिस्थितीत घेतले गेले, याचीही स्वतंत्र चौकशी करावी आणि अशा पत्रांमुळे शेतकऱ्यांचा कायदेशीर हक्क बाधित होणार नाही, याची स्पष्ट भूमिका प्रशासनाने जाहीर करावी.

# सिंचन अनुदानासाठी आता 'सेंट्रल बँक डिजिटल चलन' प्रणाली;

## अमरावतीसह 21 जिल्ह्यांत अंमलबजावणी

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत राज्यातील 21 जिल्ह्यांमधील 7 हजार 201 गावांमधील अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती आणि सर्व महिला शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान आता 'सेंट्रल बँक डिजिटल चलन' (सीबीडीसी) या डिजिटल प्रणालीद्वारे थेट वितरित करण्यात येणार आहे. नाशिक, नागपूर आणि चंद्रपूर येथील यशस्वी प्रयोगानंतर आता अमरावतीसह सर्व प्रकल्प जिल्ह्यांत ही पद्धत लागू झाली आहे. जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने चालणाऱ्या या प्रकल्पात पूर्वी लागू असलेल्या 'बॅक-एंडेड सबसिडी' पद्धतीमुळे शेतकऱ्यांना सुरुवातीला स्वतःच्या खिशातून पूर्ण रक्कम खर्च करून सिंचन संच खरेदी करावा लागायचा. भांडवलाअभावी अनेक अल्पभूधारक शेतकरी या योजनेपासून वंचित राहायचे. ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने 'सीबीडीसी' आधारित फ्रंट एंडेड प्रणाली लागू केली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांवर सुरुवातीला पैसे उभारण्याचा ताण पडणार नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी डीबीटी पोर्टलवर अर्ज करताना 'P-CBDC' हा पर्याय निवडून 'PNB Digital Rupee App' डाऊनलोड करायचे आहे. पूर्वसंमती मिळताच शेतकऱ्यांच्या डिजिटल वॉलेटमध्ये अनुदानाच्या रकमेइतके डिजिटल टोकन जमा होतील. हे टोकन अधिकृत विक्रेत्याकडे क्यूआर कोडद्वारे स्कॅन करून वापरता येतील. शेतकऱ्यांना केवळ उर्वरित रक्कम भरून संच खरेदी करता येईल आणि यासाठी बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याची गरज नाही. प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झाल्यावर अनुदानाची अंतिम रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केली जाईल. ही सुरक्षित व पारदर्शक डिजिटल प्रणाली सूक्ष्म सिंचनाचा प्रसार वेगाने वाढवणारी ठरणार असून, पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घेण्यासाठी जवळच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# जठारपेठ भागात लोंबणारी धोकादायक विद्युत तार



प्रतिनिधी १५ जुलै

**अकोला :** जठारपेठेत प्रसाद कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर प्रवाहित विद्युत तार लोंबत आहे. अतिशय धोकादायक असा प्रकार आहे परंतु महावितरणचे याकडे लक्ष नाही. याठिकाणी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वेळीच लक्ष देऊन दुरूस्ती करावी अशी मागणी आहे.

ही तार इतकी खाली आली आहे की वाहनांना स्पर्श करीत आहे. बाजूला इमारत बांधकाम सुरू असल्याने वाहनांची ये जा सुरू असते.

शाळेच्या बसेस देखील येथे उभ्या असतात. लोंबणारी प्रवाहित विद्युत तार तातडीने व्यवस्थित करावी. महावितरण यंत्रणेने गांभीर्य लक्षात घ्यावे अशी मागणी केली जात आहे.

# राष्ट्रीय शाळेचा वर्धापन दिन माजी विद्यार्थी संघाच्या वतीने उत्साहात साजरा

प्रतिनिधी १५ जुलै



**अकोला :** स्थानिक टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर शाळा उमरी मोठी अकोला येथे ऐतिहासिक शाळेचा वर्धापन दिन माजी विद्यार्थी संघाच्या वतीने उत्साहात संपन्न झाला. शाळेला १०७ वर्ष पूर्ण झाली सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक स्व. आबासाहेब कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर जोशी हे होते तर उद्घाटक म्हणून काशिनाथ चौधरी हे होते कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून. शंकरराव टापरे, विश्वास बोराडे, दिगंबर वनारे, उमेश मसने, दत्ता कोल्हे, नयनाताई इनामदार, संध्याताई भटकर, गजानन धामणकर, शिवाजीराव बचाटे, भिकाजी इंगळे ,विजेंद्र वरोकार, इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती तर उपस्थिती म्हणून प्रकाश मालगन, सुनील भातुलकर, किरण सावके, संजय पळसपगार,शैलेश ओळंबे, अरुण धनभर, देवानंद इंगळे यांची उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंबादास निकाळजे, शरद इंगोले, रवींद्र वानखडे, प्रमोद टाळे, सुभाष गायकवाड, संतोष गावंडे प्रशांत गिरी माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला. आजी-माजी शिक्षक व कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल राव थोटे यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश मसने यांनी केले.

# फुल फळ रोपे विक्रेत्यांकडून अतिक्रमण



प्रतिनिधी १५ जुलै

## महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने लक्ष द्यावे

**अकोला :** शहरात दररोज अतिक्रमणाचा विळखा दिसून येतो. सध्या पावसाळा सुरू आहे. यावेळी फुले फळ रोपे विक्रेत्यांकडून अशोक वाटिका ते नेहरू पार्क रस्त्यावर कुंड्या ठेवलेल्या दिसतात. रोपांची लागवड करण्यासाठी लहान मोठ्या कुंड्या विक्रीसाठी आणल्या आहेत. रस्त्यावर पसारा मांडल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होत आहे.

उड्डाणपुलाला लागून अशोक वाटिका ते नेहरू पार्क रस्त्यावर फळ, फुले विक्रेत्यांनी रस्त्यावर दुकानदारी सुरू केलेली दिसते. त्यामुळे वाहन चालकांची पंचाईत होत आहे. या विक्रेत्यांना महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने समज देण्याची गरज आहे. आपल्या कक्षेत दुकानदारी करावी, जेणेकरून नागरिकांना त्रास होणार नाही.

# राजेंद्र कॉलनी, विजय कॉलनी नजीक युवकाची हत्या

प्रतिनिधी १५ जुलै

**अमरावती :** शेख आफाक शेख शकील रा (ताज नगर) यांची भोसकून हत्या करण्यात आली आहे.



## हाताचा पंजा कापला

ही आज सकाळी उघडकीस आली. परिसरात आफाकचा कापलेला हात आढळून आला. पोरवाल सिमेंट डेपोच्या जवळ जमिनीवर रक्ताचा मोठा सळा दिसून आला. ही घटना सकाळी ८:०० वाजता घडली. , ज्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी ९:३० वाजता इर्विन रुग्णालयात आफाक या तरुणाचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. आफाकच्या मानेवर आणि छातीवर वार करण्यात आले होते. तसेच त्याचा हातही कापला गेला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करीत आहे, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जात आहेत.

# तेल्हारा पंचायत समितीतील एपीओ एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १५ जुलै

**तेल्हारा :** पंचायत समिती मधील सहायक कार्यक्रम अधिकारी (एपीओ) संदीप विवय झाडोकार यांना ६ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) अकोला पथकाने मंगळवारी रंगेहात पकडले. या प्रकरणात तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे यांनाही ताब्यात घेण्यात आले असून, दोघांविरुद्ध तेल्हारा पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे बांधकाम साहित्य पुरवठ्याचा व्यवसाय करतात. सन २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत पिवंदळ खुर्द येथील आर.सी. मातोश्री पांदण रस्त्याच्या कामासाठी त्यांनी साहित्य पुरवठा केला होता. या साहित्याचे सुमारे १४ लाख ७८ हजार रुपयांचे देयक ग्रामपंचायतीकडे प्रलंबित होते. हे देयक मंजूर करून देण्यासाठी पंचायत समिती, तेल्हारा येथील तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे आणि सहायक कार्यक्रम अधिकारी संदीप झाडोकार यांनी सुरुवातीला ७ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारदाराने एसीबीकडे केला. तसेच देयक मंजूर झाल्यानंतर साहित्य पुरवठ्याच्या १४.७८ लाखांच्या देयकासाठी ६ हजारांची लाच स्वीकारताना अटक; तांत्रिक सहायकालाही घेतले ताब्यात १४ लाखांच्या रकमेवर प्रत्येकी एक टक्का, म्हणजेच १४ हजार रुपये स्वतंत्रपणे देण्याचीही मागणी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. तक्रारीची ८ जुलै २०२६ रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणीत सहायक कार्यक्रम अधिकारी संदीप झाडोकार यांनी ६ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे, तर तांत्रिक सहाय्यक शिरीष सदापुरे यांनीही या व्यवहारास प्रोत्साहन दिल्याचे एसीबीच्या तपासात निष्पन्न झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

### यानंतर १४ जुलै रोजी तेल्हारा येथील आर.

» के. बार गार्डन अँड रेस्टॉरंट येथे सापळा रचण्यात आला. त्यावेळी संदीप झाडोकार यांनी तक्रारदाराकडून ६ हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. त्यानंतर दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणातील कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक मिलिंदकुमार बहाकर यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक प्रवीण वेरूळकर आणि त्यांच्या पथकाने केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135